# कौमुदी*

‘व्यासं विघ्नेस्वरम’ ह्या आनंद लिखित मल्याळम कादंबरीवर तसेच लुई बोर्हेस ह्यांच्या 'ब्लाइंडनेस' या निबंधावर आधारित नाटक

मूळ लेखकः अभिषेक मजुमदार

मराठी अनुवादः कौस्तुभ सोमनाथ नाईक

पात्रे

मॅनेजर

परितोष कुमार

सत्यशील

मुरारी

अभिमन्यूचं भूत

दुर्योधनाचं भूत

सुभद्रा

कुत्रा

कृष्ण

अर्जुन

इतर

पहिला प्रयोगः कला अकादमी, पणजी गोवा येथे ०८ जानेवारी २०१८ रोजी सादर झाला.

सादरकर्ते : हंस संगीत नाट्य मंडळ, गोवा

दिग्दर्शकः कौस्तुभ सोमनाथ नाईक

* हाकारा । hākārā या मराठी व इंग्रजीतून प्रकाशित होणाऱ्या ऑनलाईन नियतकालिकाच्या पाचव्या आवृत्तीमध्ये (ऑगस्ट २०१८) ‘कौमुदी’ या नाटकाचे मराठी भाषांतर प्रकाशित झाले आहे. मराठी नाटकाच्या सादरीकरणासाठी भाषांतरकाराची परवानगी आवश्यक. परवानगीसाठी कौस्तुभ नाईक यांच्याशी naikaustubh@gmail.com या ईमेलद्वारे संपर्क साधावा.

**अंक पहिला**

(पडदा उघडतो. रंगमंचावर मध्यभागी सत्यशील. हिरवा निळा क्रॉस लाईट.)

सत्यशीलः आता मला सगळं स्पष्ट दिसतंय. माझ्या चहूबाजूला हिरवं निळंशार धुकं व्यापून राहिलंय. तिथे मांडवी पुलावरून ह्या बाजूला यायला न जाणे किती श्रीमंत लोकांच्या गाड्या कूच करत आहेत. बस भरूनपण लोकं येत आहेत. प्रेक्षकांचा गोंधळ कानी पडतोय. तोच, जो ते माझ्या नाटकाच्या आतुरतेने करत असतात. चहूबाजूंनी प्रकाश आहे. बाहेर गर्दी आहे आणि ह्या संध्याकाळच्या नशेत चूर, नदी पार करत, दीनानाथ थेटरापाशी यायला निघालेली गर्दी. दूरवर असणारी प्रत्येक गोष्ट आता इतकी जवळ येत चालली आहे की कुठेच काही दिसत नाही. पण हे सर्व जवळचं सत्य आहे. मनुष्याला जन्माच्या पहिल्या क्षणापासून दृष्टीचं वरदान प्राप्त आहे पण जवळचं बघायची दृष्टी त्याच्यापाशी नाही. हेच त्याचं दुबळेपण आहे. दूरचं तर तो नेहमी जाणू शकतो. त्याचे नाक, कान, आकलन क्षमता सतत दूरवरचं बघण्यात आणि जाणण्यात लागलेले असतात पण जवळचं जाणण्याचं सुख त्याला प्राप्त नाही. किंबहुना ह्याचसाठी इतके सारे सुशिक्षित लोक दर सायंकाळी नाटक बघायला ह्या दीनानाथ थेटरात येतात. जवळच्या गोष्टी दुरून पाहायला. आपल्या उणीवा, आपले विकल्प, आपल्या हरत व मरत चाललेल्या आदर्शांची लढाई, आपली द्वंद्वं ह्या रंगमंचावर बघायला. हाच रंगभूमीचा भ्रम आहे. एक सुंदर धोका. बनावट. व्यसनाधीन बनवणारा मोह. म्हणूनच कदाचित नाटकात तुमची दृष्टी जाणं त्या मोहाच्या पलीकडे जाण्यासदृश आहे. वाक्, अंग, दृष्टी, दृष्टिकोन, जिथे ह्या साऱ्या गोष्टींचा अंत होतो तिथेच कुठेतरी रंगभूमीच्या भ्रमाची सुरुवात होते. आंधळेपणात नसतो अंधार, असतो हा सतत राहणारा निळाशार हिरवा प्रकाश. ह्या प्रकाशाला अंधारात न बदलता येणं हीच आंधळेपणाची मर्यादा आहे. प्रकाशाच्या कारभारापासून प्रकाशाच्या कारभारापर्यंतचं अंतर किती शिताफीने

पार करतोय मी. दीनानाथ थेटराच्या रंगमंचापासून आंधळेपणापर्यंतचं अंतर, जेवढं दिसतंय तेवढंही दूर नाहीये!

(अंधार)

(रंगमंचावर एका बाजूला सत्यशील ग्रीन रूममध्ये बसलेला. मॅनेजर आणि मुरारी काहीबाही काम करत येरझाऱ्या घालताहेत.)



मॅनेजरः हे बघ, मी हजार वेळा तुला सांगितलंय की प्रयोग संपल्यानंतर सामान एकत्र करताना एक यादी बरोबर ठेवत जा आणि गोळा केलेल्या सामानाशी ती ताडून पाहात जा. तरीही तू आगाऊपणा केलासच. आता शोध ते पिस्तूल. असला हलगर्जीपणा इथे चालणार नाही.

मुरारीः असं दाखवताय जणू काही की तसलं पिस्तूल गोव्यात कुठेच सापडणार नाही.

मॅनेजरः आख्ख्या गोव्यातच काय, मराठी रंगभूमीच्या कुठल्याही थेटरात असलं पिस्तूल शोधून सापडणार नाही. तुम्हा हौशी रंगभूमीवर काम करणाऱ्यांचा प्रोब्लेम हाच आहे की तुम्ही पान खाऊन थुंकल्यागत नाटकं करता. कसल्याच गोष्टीची कदर नाही.

(परितोष प्रवेशतो)

तुम्ही....

परितोषः तुम्ही?

मॅनेजरः अभिनय करायला आला आहात का? झब्बा वगैरे घालून एकदम. बाहेर नाव लिहून ठेवा गरज लागल्यास बोलवू. आणि हो, एखादी अभिनेत्री आहे का ओळखीची? अभिनेत्री....नटी...स्त्रीच्या वेशात पुरूष नको.. स्त्रीसारखी स्त्री. असल्यास तिचा पत्ता द्या. गरज आहे. तिला ठेवून घेतल्यास तुम्हालाही चार आणे देऊ.

परितोषः तुम्ही कोण?

मॅनेजरः मी या दीनानाथ थिएटरचा मॅनेजर. आणि तुम्ही असे रंगपार्टात आत येऊ शकत नाही.

(मॅनेजर जातो. मुरारी तिथेच घुटमळत आहे. )

परितोषः (मुरारीला) सिगरेट?

(मुरारी सिगरेट घेतो)

मॅनेजरः (मागे वळून परत येतो) हे बघा, तुम्ही असे विडी वगैरे देऊन...अरे सिगरेट आहे का (परितोषकडून सिगरेट घेऊन पेटवतो.) कसं काय येणं केलंत?

परितोषः मी एकलव्याच्या भूमिकेसाठी...

मॅनेजरः (त्याला बाजूला घेऊन जातो) ए..तिथे चल! डोक्यावर पडलायस का तू? स्वतः मरशील आणि आमची ठासून ठेवशील इथे. (सत्यशीलकडे बोट दाखवत) ते कोण आहेत माहीत आहे का?

परितोषः कोण?

मॅनेजरः सत्यशील! मास्टर सत्यशील. कालपरवाचा नवखा पोरगा इथं एकलव्य अभिमन्यूचं नावदेखील घेताना त्यांच्या कानी पडलं तर माझी म्यानेजरी बंद करवून थिएटरच्या स्वयंपाकघरात कामाला लावतील. आणि ह्या नाटकवाल्यांना खायला भरपूर लागतं.

परितोषः ओह! तर हे आहेत मास्टर सत्यशील.

मॅनेजरः हळू बोलायला काय घेशील? जेव्हापासून त्यांची दृष्टी अधू होत चालली आहे तेव्हापासून त्यांची ऐकण्याची क्षमता चौपट वाढली आहे. आजकाल नाटक करताना

आपल्या डायलॉग्जसोबत शेजारच्या थेटरातील पात्रांच्या डायलॉग्जवर त्यांचं बारीक लक्ष असतं.

परितोषः (कुत्सितपणे) ओह!

मॅनेजरः तुम्हाला मस्करी वाटतेय? ते काय तुम्हाला साधारण कलाकार वाटले? काल रात्री अंक संपल्यावर मला म्हणत होते की खबर काढ शेजारच्या हनुमान थेटरात चालू असलेल्या सीताहरण नाटकात रावणाची भूमिका कोण करतंय.

मुरारीः दत्ता लोटलीकर. माझा मेहुणा आहे.

मॅनेजरः तू पिस्तूल शोध. सत्यशील म्हणाले रावणाच्या पात्राला अनेक कंगोरे आहेत. त्यात फक्त क्रूरता साकारली तर ते पात्र फिकं पडतं. कदाचित असंही असेल की रावणाच्या मनामध्ये सीतेविषयेयी प्रेमभावना उत्पन्न झाली असेल. अभिनेत्याने हे बारकावे हेरले पाहिजेत. माझ्या जाण्याआधी त्याला इथे पाठवा त्याच्याशी ह्यावर चर्चा करता येईल.

मुरारीः दत्तूला बोलावू का उद्या?

मॅनेजरः तू सांगितलेलं काम कर.

परितोषः (हसू आवरत) हां, बोलवा बोलवा!

मॅनेजरः अहो, बोलवा काय? आणि तुम्ही अजून इथे काय करताय? निघा आता.

परितोषः मी कोल्हापूरहून आलोय.

मॅनेजरः बरं केलंत. आता परत जा.

परितोषः मी परितोष कुमार. बलवंत थिएटरमध्ये ह्याच नाटकात मी अभिमन्यूची भूमिका करतो. मला तुमच्या थेटरात...

मॅनेजरः (ओशाळलेला) अरे! मुरारी चहापाण्याची व्यवस्था कर मोठे नट आलेत. आणि ते मुख्य पात्रांना देतात त्या कपबशा घेऊन ये. भालदार-चोपदारांना देतात ते नको. ते झालं असं की...म्हणजे माफ करा मला वाटलं की एकलव्याच्या भूमिकेसाठी तुम्ही येणार म्हणजे वयाने थोडे प्रौढ वगैरे असाल. तुमचं नाव ऐकलंय पण फोटो कधी पाहिला नव्हता. (मुरारी खुर्ची आणतो. परितोष बसतो)

मॅनेजरः इतकी वर्षे थिएटर व्यवसायात आहे प्रथमच असा नट पाहतोय जो वेळेआधी येतोय. हे नट लोक स्टेजवर काहीही करोत पण व्यक्तिगत जीवनात खूपच कामचुकार असतात. म्हणजे इतर नट, तुम्ही नव्हे.

परितोषः मी आजपासूनच सुरू करायचं म्हणतोय.

मॅनेजरः आजपासून?

परितोषः हो.

मॅनेजरः	हे बघा, कोणी दुसरा कलाकार असता तर तुमचं काम झालं असतं, परितोषजी. मी बिलकुल केलं असतं. एवढ्या कमी वयात आपण एवढं नाव कमावलंय की तुम्ही बलवंत सोडून इथे येण्याचा निर्णय घेतला हे ह्या दीनानाथ थेटराचं भाग्यच आहे. पण हल्ली सत्यशील साहेबांना..तुम्हाला माहीत असेलच त्यांची दृष्टी अधू होत आहे. तर मी त्यांच्या दिनचर्येत कुठलीच नवी गोष्ट टाकत नाही. कदाचित त्यांना त्याचा..

परितोषः	तुम्ही ह्या म्हाताऱ्या कलाकारांना डोक्यावर चढवून ठेवलंय. त्यांच्या नंतर मला ही भूमिका सादर करायची आहे. त्यासाठी जर मला एक दिवस आधी कामाला सुरुवात करणं संयुक्तिक वाटत असेल तर तसं करण्याची मुभा मला असायला हवी. काम मला करायचंय, त्यांना नाही.

(मौन)

मॅनेजरः	हे बघा, तुम्ही तरुण आहात. तुम्हाला..

परितोषः	मॅनेजर साहेब, एक गोष्ट लक्षात ठेवा, मी कलाकार आहे. तुम्ही माझ्यासाठी काम करता आहात मी तुमच्यासाठी नाही. जर तुम्हाला असं वाटत असेल की दीनानाथ थेटरातील एकलव्य आणि अभिमन्यू (सत्यशीलला उद्देशून) ह्या भोंदूगिरीच्या अभिनयापेक्षा वेगळा आणि चांगला व्हावा तर निश्चितच माझ्या म्हणण्याप्रमाणे इथे काम व्हावं लागेल. ही गोष्ट तुमच्या ध्यानात राहू द्या.

सत्यशीलः	(आतून) मॅनेजर साहेब...तुम्ही आहात का इथे?

मॅनेजरः	काय झालं सत्यशीलजी?

सत्यशीलः हा आरसा साफ नाहीये का मी दुसऱ्या डोळ्याने पण अधू झालोय?

मॅनेजरः आरसा साफ नाहीये.

सत्यशीलः तुम्ही माझ्यापेक्षाही कमालीचे कलाकार आहात. तो नवीन मुलगा आला का?

(परितोष दरवाज्यापाशी येतो. सत्यशील एकटाच नाटकातील वाक्य बोलतोय.)

मी शिकवीन तुला अभिमन्यू! जीवन आणि मृत्यू दोन्हीही अंधाराचे प्रतीक आहेत. अंधारात प्राण, प्रतिशोध, आणि घृणेला महत्त्व आहे. वास्तवता सत्य कौमुदीचं शास्त्र आहे. ही कौमुदी कृष्णाची नव्हे, एकलव्याची आहे. तुला तुझी उत्तरं कृष्णाच्या कौमुदीत नव्हे तर एकलव्याच्या कौमुदीत प्राप्त होतील. ही कृष्णाच्या षडयंत्रांची कौमुदी नव्हे, एकलव्याच्या सत्याची कौमुदी आहे. (परितोषला) इथपर्यंत बसने आलास?

परितोषः अं हो.

सत्यशीलः कसा झाला प्रवास?

परितोषः ठीक.

सत्यशीलः जेव्हा मी काम करायला सुरुवात केली होती तेव्हा बसमध्ये केवळ साहेब लोक बसत होते. आम्हाला पायीच जावं लागत होतं. ह्या बसचा आवाज ऐकू येतोय का तुला?

परितोषः	मला बस दिसते.

सत्यशीलः	(त्याच्यावर एक कपडा फेकून मारतो) माफ करा. त्याचं असं आहे की मी विसरूनच जातो की तुम्हा लोकांना सगळं दिसतंय. तुला मांडवीपलीकडे एक मोटार दिसतेय? एक मोटार जी ह्या बाजूला येतेय.

परितोषः	अं नाही!

सत्यशीलः	पण मला ऐकू येतोय तिचा आवाज. ह्याच दिशेला येतेय. तू पण चार दिवस कमी बघितलंस तर तुला जास्त ऐकायला येईल. तू हवं असल्यास तर कमी बघू शकतोस. मला हवं असून सुध्दा मी जास्त बघू शकत नाही. ही जी मोटार आहे ती लवकरच इथून जाणार आहे. आणि आज जरी ह्यात फक्त साहेब लोक बसले तरी एक दिवस सगळेच बसतील. तुम्ही म्हणाल परिवर्तन आहे... बरोबर आहे ना मॅनेजर साहेब?

मॅनेजरः	हो हो, एकदम!

सत्यशील :	ह्यालाच मी भरपाई मानतो. ही अशी भरपाई प्रत्येक पिढी आपल्या पुढच्या पिढीला देते. कारण तिला माहीत असतं की पुढची पिढी आपल्यपेक्षा कमी हुशार, कमी आधुनिक आणि माणुसकीचा अभाव असलेली आहे. म्हणूनच तर ते पुढच्या पिढीसाठी अपेक्षा कमी आणि सामान जास्त ठेवून जातात.

(मोटार गेल्याचा आवाज.)

तू बसमधून आला आहेस आणि तुझी पुढची पिढी मोटारीत बसून फिरेल ह्यात तुझा काही दोष नाही. तुझ्यासारख्या नवख्या पोराने बसमधून यावं आणि मी मात्र पायी यावं...असा कोणताच गुन्हा मी केला नव्हता... कधीपासून सुरुवात करायचा विचार आहे?

परितोषः आजपासून.

सत्यशीलः सुरूवात कशाने करणारेस?

परितोषः मी तुम्हाला एकलव्य करताना बघू इच्छितो. आणि तुमच्याबरोबर आजच अभिमन्यूची भूमिका करावी असा विचार आहे.

सत्यशीलः माझं पात्र करण्यासाठी तू मला थेट रंगमंचावर भेटणार आहेस?

परितोषः हो.

मॅनेजरः हे बघा, हे होणे शक्य नाही. अभिमन्यूची भूमिका सतीश करतोय.

सत्यशीलः त्याला मी समजावेन, मॅनेजर साहेब. माझ्याकडून त्याला आजची नाईट पण द्या. मला ह्याच्या अभिमन्यू कारण्याबाबतीत कसलीच समस्या नाही. पण एक सल्ला देऊ इच्छितो, ऐकशील?

परितोषः बोला.

सत्यशीलः अभिमन्यूवर लक्ष ठेव. एकलव्य आत्मसात करण्यासाठी अभिमन्यूला समजणं खूपच गरजेचं आहे. तू मला बाहेरून बघायचा प्रयत्न करू नकोस. माझ्याबरोबर अभिमन्यू आतून खेळ. बाहेरून बघणं दृष्टीचा अपमान आहे. दृष्टी आणि बघण्यातला फरक समजतोस ना तू?

परितोषः मी बलवंत थिएटरमधल्या दिग्गजांकडून अभिनयाचे धडे घेतले आहेत. मी तुमच्यासारखा...

सत्यशीलः म्हणूनच म्हणतोय...अभिमन्यूवर लक्ष ठेव. आपल्या शिक्षणाचा अडसर बनू देऊ नकोस.

(अंधार)



सत्यशील: धीर तू, दिगंत तू
आदी तू अनंत तू
पांडवांचा स्तंभ तू
कौरवांचा अंत तू

अग्नीचा लेश तू
अन् गरुडपुत्र तू
सूर्यवंशी सूर्य तू
पौरूषाचा अर्क तू

अडिग तू अनंत तू
नवीन तू युवन्त तू
धीर तू अन् वीर तू
धीर तू अन् वीर तू

(अंधार)

(सत्यशील आता सत्यशीलाच्या कलाकाराचा आत्मा बनलाय. मॅनेजर परितोषपाशी येतो.)

मॅनेजर: परितोषजी, तुम्ही अभिमन्यू शोभून दिसता खरे.

परितोषः	एक विचारू मॅनेजर साहेब?

मॅनेजरः	जरूर विचारा! मी तुमच्यासाठी काम करतो, तुम्ही माझ्यासाठी नव्हे (हसतो).

परितोषः	काल रात्री सत्यशीलजींचा अभिनय कसा होता?

मॅनेजरः	काल रात्रीचं म्हणाल तर असं वाटलं की त्यांची दृष्टी खूपच कमी झाली होती. मला वाटतं त्यांना नीटसं काहीच दिसत नसावं. आणि एकलव्याचा कौमुदीच्या वेळेचा तो डायलॉग... तिसऱ्या रात्री सगळेच तो ऐकायला येतात...त्यात त्यांनी अशी जान आणली की विचारूच नका. अभिमन्यू त्यांना विचारतो, 'हे एकलव्य, का? तू मला का शिकवत नाहीस?' आणि ज्याक्षणी ते म्हणाले 'मी तुला शिकवीन अभिमन्यू'....अहो लोक उठून उभे राहिले. माहौल असा होता की जणू एकलव्य स्वतःच दीनानाथात अवतरले होते.

(परितोष सत्यशीलच्या आत्म्याला भूत पाहिल्यासारखा बघतोय.)

मॅनेजरः	तुम्ही काय बघताय, परितोष?

परितोषः	मी..ते...काही नाही. हल्लीच मला एकदा बलवंत थेटरात अभिमन्यू करताना न जाणो का हा प्रश्न पडला की युद्धाच्यावेळी जेव्हा अभिमन्यू चक्रव्यूहात फसतो तेव्हा त्यालाच एकलव्याचं भूत का दिसतं? आणखी कोणालाच ते का दिसत नाही? आणि अर्जुनाला जेव्हा कृष्ण गीतेचा उपदेश देत होता तेव्हा बाकीचे लोक काय करत होते? कोणी ज्ञान देत असताना काळ थांबतो कसा?

मॅनेजरः तुम्हा नट लोकांना असले नसते प्रश्न का पडतात कोण जाणे. बाहेर गर्दी वाढत चालली आहे. लोक हळूहळू येताहेत. तुम्ही तयार व्हा आणि काही लागलं तर मला हाक मारा. मी इथे दरवाज्यापाशीच आहे.

(मॅनेजर जातो. अंधार)

(सत्यशीलचा आत्मा प्रवेशतो. )

सत्यशीलः तर तू आलास. मला माहीत होतं की तू एक दिवस जरूर येशील. एखादा अभिमन्यू आपली उत्तरं मागायला येणार नाही असं होऊच शकत नाही.

परितोषः तुम्हाला सगळं स्पष्ट दिसतंय. तुम्ही आंधळेपणाचं ढोंग रचलंय.

सत्यशीलः मला तर नेहमीच सगळं काही स्पष्ट दिसत आलंय. माझ्या दृष्टीला कसलीच धाड भरलेली नाही. तिथे बघ. तो आहे सत्यशील. महान मास्टर सत्यशील. तुझा बाप. जो आत्ता ह्या क्षणी आपली दृष्टी पूर्णपणे अधू व्हायच्या आधी आपल्या शेवटच्या प्रयोगाच्या तीन रात्रीसाठी तयार होतोय.

परितोषः तुम्ही फार महान कलाकार आहात बाबा, आत्ताही तुम्ही मला धोकाच देत आहात. तुम्हाला आत्तासुद्धा मीच सापडलोय मूर्ख बनवायला. एक मीच मूर्ख आणि तुम्ही तेवढे चलाख. ते दिवस गेले आता बाबा.

सत्यशीलः चांगलंच आहे. आता तुला लपून छपून माझ्याकडून शिकण्याची आवश्यकता नाही.

परितोषः मी तुमच्याकडून काहीएक शिकलेलो नाही.

सत्यशीलः	असं? लहानपणी तुझी आई वारल्यानंतर स्टेजच्या पडद्याआडून मला अभिनय करताना बघत नव्हतास तू? आणखी कुठून शिकलास हा अभिनय तू?

परितोषः	ती माझी असहायता होती. मी तुमच्या जवळ येण्याचा प्रयत्न करत होतो जेणेकरून तुम्ही मला तुमच्यासोबत न्याल. पण ती माझी चूक होती.

सत्यशीलः	मी तो नाहीये. तो सत्यशील आहे. मी त्याच्यातील कलाकाराचा आत्मा. आज पहिल्यांदा तुझ्यातील कलाकारासोबत रंगमंचावर जातोय. तर म्हटलं त्याआधी एकदा भेटावं.

परितोषः	ह्या जुन्या थेटरांतल्या भूताविषयी ऐकलं होतं. आज दर्शन पण झालं. (मॅनेजर चहा घेऊन येतो) चहा...चहा घेणार का कलाकार साहेब?

सत्यशीलः	घेऊ शकतो. कसला पाजणार?

परितोषः	चांगला.

सत्यशीलः	(चहा घेत) बलवंतमध्ये कधीपासून आहेस?

परितोषः	दहा वर्षे. तुम्ही मला तिथल्या मॅनेजरला विकलं तेव्हापासून.

सत्यशीलः	मी नाही..त्याने विकलं.

परितोषः	जेव्हापासून त्यांनी मला विकलं तेव्हापासून. मला अजून किती वेळ आहे?

मॅनेजरः	(विंगेतून?) दहा मिनिटं.

सत्यशीलः	बराच वेळ आहे. आत्ताच तर म्हणत होतास कोणी ज्ञान द्यायला लागलं तर काळ थांबतो.

परितोषः	तुम्ही मला इथे ज्ञान पाजायला आला आहात?

सत्यशीलः	तुला गरज आहे.

परितोषः	तुमच्याकडून मला कसलीच अपेक्षा किंवा ज्ञान प्राप्त करायची गरज नाहीये. अजून किती भूतं फिरताहेत इथं कोण जाणे.

सत्यशीलः	काय भूत भूत लावलंय? स्टेजवर तू थोडंच भूत बनायला जातोस?

परितोषः	स्टेजवर मी..मी असतो. त्याबाहेर भूत.

सत्यशीलः	तुला स्वतःबद्दल जरा जास्तच गर्व आहे. चहा चांगला आहे पण!

परितोषः	असायलाच हवा. तुम्ही...म्हणजे त्यांनी...संधी मिळताक्षणी दूर लोटलं. आता मी दाखवतो त्यांना की मी काय बनलोय ते.

सत्यशीलः तर तू इथे स्वतःचा एकलव्य शोधण्यासाठी नाही तर सत्यशीलचा एकलव्य मोडून काढण्यासाठी आला आहेस.

परितोषः सत्यशीलचा एकलव्य मोडून काढणं? हेच माझ्या एकलव्याचं साकार होणं आहे.

सत्यशीलः आणि अभिमन्यू? अभिमन्यूचं काय करशील?

परितोषः अजून फक्त तीन रात्री अभिमन्यू. मग आयुष्यभर एकलव्य. सत्यशीलाचा एकलव्य त्याच्याकडून हिरावून घेणं. एक माणूस जो पूर्णतः एक बाप बनू शकला नाही त्याला एक पूर्ण कलाकार बनण्याचा कसलाच हक्क नाही. पुढच्या तीन रात्रीत त्यांच्या कामाला मी धुळीत मिळवून टाकीन. कोणीच त्यांची आठवण ठेवणार नाही.

(मॅनेजर प्रवेशतो)

मॅनेजरः तुम्ही ठीक आहात ना परितोष?

परितोषः अं हो, मी माझे डायलॉग्स आठवत होतो.

मॅनेजरः ओह! काही लागलं तर बोलवा. तुमचा पहिलाच प्रयोग आहे दीनानाथात. तुम्ही जरा चिंतीत दिसतात.

परितोषः मला कसलीच चिंता नाही. तुमचं काम झालं असेल तर तुम्ही जाऊ शकता.

मॅनेजरः ठीकाय.

परितोषः आज माझा दिवस आहे.

(अंधार)

(सत्यशील आरशासमोर बसलाय. अभिमन्यूचं भूत तिथे आहे.)

सत्यशीलः कोण..कोण आहे तिथे? ह्याला बाहेर काढा. तुम्ही असं कलाकारांच्या खोलीत येऊ शकत नाही.

अभिमन्यूः एवढा उत्तेजित होऊ नकोस सत्यशील. तुला काय वाटलं? तुझी दृष्टी केवळ कमी होत चालली आहे? दृष्टीच्या जाण्याने माणसाला कमी नाही तर वेगळं दिसतं. तुझ्या अभिनय कारकिर्दीच्या शेवटच्या तीन रात्रीत तरी तुला खऱ्याखुऱ्या अभिमन्यूचा सामना करावाच लागेल.

सत्यशीलः अभिमन्यू? काय तमाशा आहे हा? कोण आहे हा?

अभिमन्यूः पुन्हा तेच! इतके खोटे अभिमन्यू तू आपल्या सोयीसाठी बनवलेस आता खरा अभिमन्यू पुढे ठाकल्यावर एवढा त्रास होतो तुला?

सत्यशीलः तू अभिमन्यू कसा असशील? तो तर तरुण होता.

अभिमन्यूः एकलव्यापेक्षा तूही खूपच म्हातारा आहेस सत्यशील. तुला काय वाटलं? तुझं वय वाढेल, तू मोठ्यामोठ्या बाता करशील, आणि अभिमन्यू तसाच राहील? मी तुझ्याहून फार मोठा आहे सत्यशील. आणि तुझ्या ह्या ढोंगाच्या नाटकाचा आणि माझ्या वास्तवाचा काहीच मेळ नाहीये.

सत्यशीलः	माझ्या थेटरात येऊन असली बडबड नको. नाटक सत्याचं शास्त्र आहे, ढोंगाचं नव्हे.

अभिमन्यूः	(हसत) असं? आणि तुझ्यासारखे पाखंडी, कमजोर, भित्रे लोक, जे कधीच बनू शकले नाही एक जबाबदार बाप ना पती ना पुत्र...तुमच्यासारखे लोक आम्हाला सत्याचा मार्ग दाखवणार? आपल्या मुलाला तर तू विकून टाकलंस...आणि आता सगळ्या  समाजाच्या नीतिमूल्यांचं उत्तरदायित्व आपल्या खांद्यावर घेण्याचं ढोंग करत आहेस.

सत्यशीलः	तो माझा मुलगा नाहीये. केवळ पोटी जन्माला आला म्हणून कोणी पुत्र होत नाही.

अभिमन्यूः	आता हे पण तू आपल्या ढोंगी नाटकापासून शिकलायस का?

सत्यशीलः	नाही. तुमच्याच महाभारतातून.

अभिमन्यूः	आमच्या महाभारतातील त्या संस्करणातून जे तुझ्या प्रेक्षकांना तुझी कला दाखवण्यासाठी सोयीचं आहे. पूर्वी तर नऊ नऊ रात्री नाटक चालायचं. आता ते तीन रात्रींवर येऊन पोचलंय. काही वर्षांनी ही सगळी थेटरं बंद पडतील. तुमचं ढोंग आता प्रेक्षकांनी पण हेरलंय हे तुला कळतंय ना?

सत्यशीलः	तुला सत्याची जाणीव असती तर तू चक्रव्यूहात गेला नसतास. सत्य आणि कथितात हाच फरक आहे, अभिमन्यू. ह्या रंगमंचावरचं सत्य समजायला तुला माणूस व्हावं लागेल, भूत नाही. कथा मनुष्याला बनवते आणि मनुष्य तुम्हासारख्या साधारण लोकांना इतिहास. नाटक नसतं तर तुम्हाला कोणीच मतीत

ठेवलं नसतं? आणि रंगभूमीवर सादर होणारं महाभारत हे तुमच्या प्रत्यक्ष महाभारतापेक्षा कैकपटीने अधिक मूल्यवान आहे.

अभिमन्यूः इतकं मूल्यवान की तू महाभारतातल्या नीतीला अनुसरुन स्वतःच्या पुत्राला पुत्र मानण्यास नकार देतोयस.

सत्यशीलः तुला नाही कळणार, अभिमन्यू. मी कितीतरी अभिमन्यू घडवलेत. अभिमन्यूला तुझ्यापेक्षा मी जवळून ओळखतो.

अभिमन्यूः बरं! आता कितीसं दृष्टीस पडतंय तुला?

सत्यशीलः खूपच कमी. एका डोळ्यानेच काय ते थोडं फार. धूसर. पण हा आंधळेपणातला प्रकाश मला स्पष्ट दिसतोय. हिरवा निळाशार प्रकाश.

अभिमन्यूः ह्या प्रकाशाशी तुझं बरंच जुनं नातं आहे, सत्यशील! तुझं उभं आयुष्य तू ह्या प्रकाशाखाली व्यतीत केलं आहेस. तुला वाटत आलंय की हे काही मोठं कामं नाहीये. लोकांवर अंधार करायचा, रंगमंचावर प्रकाशाचा भ्रम निर्माण करायचा, स्वतः त्या प्रकाशाच्या भ्रमात राहून मोठमोठ्या गोष्टी करायच्या, आणि प्रेक्षकांपुढे हे ढोंग करायचं की तू खूप ज्ञानी आहेस.

(मॅनेजर येतो)

मॅनेजरः सत्यशीलजी, तुमचा तुळशीयुक्त चहा.

सत्यशीलः धन्यवाद!

मॅनेजरः अजून काही?

सत्यशीलः हे औषध तेवढं माझ्या डोळ्यात टाका.

मॅनेजरः जी.

(मॅनेजर ड्रॉप्स डोळ्यात घालतो. अभिमन्यू सत्यशीलपाशी येऊन थांबतो)

सत्यशीलः काय हवंय तुला?

अभिमन्यूः मी तुझा अंत पाहू इच्छितो. तुझ्या खोटारडेपणाचा अंत. एक कोडं विचारू? महाभारतातील कोडं.

सत्यशीलः तू, एक हरलेलं पात्र, मला कोड्यात टाकशील? विचार बाबा, अवश्य विचार.

अभिमन्यूः चहात चहा काय आहे? चहा पत्ती चहा आहे? साखर चहा आहे? दूध चहा आहे का पाणी चहा आहे?

(विराम.)

मॅनेजरः सत्यशीलजी, औषध घालून झालं.

सत्यशीलः हां धन्यवाद, तुम्ही निघा आता.

(अंधार)

(परितोष आरशासमोर. सत्यशीलच्या कलाकाराचा आत्मा त्याच्यासमोर)

सत्यशीलः तुला एक कोडं घालू परितोष?

परितोषः जे काही घालायचंय ते लवकर घाला. मला उशीर होतोय.

सत्यशीलः चहात चहा काय आहे? चहा पत्ती चहा आहे? साखर चहा आहे? दूध चहा आहे का पाणी चहा आहे?

परितोषः तर तुम्ही नाटक सुरू होण्याच्या ठीक अगोदर कलाकारांना फाजील प्रश्न विचारणाऱ्यापैकी आहात.

सत्यशीलः अरे, शंभरवेळा तेच नाटक केलं असशील तू. दे ना माझ्या कोड्याचं उत्तर.

(अंधार)

(आंधळा सत्यशील आणि परितोष दोघेही मध्यभागी उभे आहेत. मॅनेजर पुढे. तिघांवर स्पॉट.)

मॅनेजरः आपल्या सर्वांचं दीनानाथ थेटरात हार्दिक स्वागत. सर्व रसिक प्रेक्षकांचं मास्टर सत्यशीलजी यांच्या तर्फे... (टाळ्या) समस्त रसिकप्रेक्षकांचं मी मनापासून स्वागत करतो. मला खात्री आहे पुढील तीन रात्री आपण सर्वजण इथे मास्टर सत्यशीलांना बघायला येणार आहातच. त्यांच्या अभिनय कारकिर्दीच्या शेवटच्या तीन रात्रीची

खबर सर्वत्र पसरली असून ठिकठिकाणाहून लोकांनी इथे यायला रीघ लावली आहे.

(बोलता बोलता आवाज मंद होत जातो.)

सत्यशील: अभिमन्यू चहात चहा काहीच नाही. ना पाणी चहा आहे ना साखर चहा आहे ना पत्ती चहा आहे ना दूध चहा आहे.

परितोष: चहात चहा सगळंच आहे. पाणी चहा आहे अन् साखर चहा आहे. पत्ती चहा आहे अन् दूधही चहा आहे.

सत्यशील: चहात विरघळून साखर साखर राहत नाही.

परितोष: दूध नेहमी दूधच राहतं. आणि साखर नेहमी साखर. जी वस्तू जशी बनली आहे ती निरंतर तशीच राहते. ज्याप्रकारे कौमुदीमुळे चंद्र कमी होत नाही. चंद्र चंद्रच राहतो आणि त्याचा प्रकाशही.

सत्यशील: जसा प्रकाश उर्जित केल्यानंतर चंद्र चंद्र राहत नाही ना त्याचा प्रकाश प्रकाश राहतो. आपणाला जे उमजतं ते आपण नसतो.

परितोष: आपण चिरंतन आहोत.

सत्यशील: आपण कोण आहोत ह्याविषयी आपण अनभिज्ञ असतो. आपल्या असण्याचा अर्थ ह्या अनभिज्ञतेतच आहे.

परितोषः मी तयार आहे. नाटकाला सुरुवात करा.

मॅनेजरः मास्टर सत्यशील ह्यांच्या सर्वांगसुंदर अभिनयाने नटलेलं आणि त्या जोडीला सुप्रसिद्ध युवा अभिनेते परितोष कुमार आणि दीनानाथ थिएटरचे इतर कलाकार सादर करत आहेत नाटक "कौमुदी"....

(टाळ्या)

(अंधार)

अर्जुनः ज्याक्षणी शत्रू डाव्या बाजूने येईल त्याचक्षणी उजव्या बाजूला प्रथम अस्त्र चालवणं आवश्यक.

कृष्णः अर्जुना...हे अर्जुना...तू पण काय बावळटासारखा बोलत बसलाय. इतक्या साऱ्या बायका केल्या तरी अजूनदेखील तुला हे कळत नाही कुठलीही आवश्यक सूचना आपल्या पत्नीला अर्ध्या रात्री देत नसतात. प्रत्येक पुरुषाला किंबहुना हेच वाटत असावं की त्याची पत्नी एक चांगली विधार्थिनी बनावी. ज्याचं इतर कोणी ऐकत नाही ते विवाह ह्याचसाठी करतात की त्यांचं घरी तरी कोणी ऐकेल. पण हे कधीच पूर्ण...

अभिमन्यूः आई...हे आई... बाबा काय बोलत सुटलेत आणि तू अजिबातच लक्ष देत नाहीयेस. मी मघापासून हाच विचार करतोय की बाबा तुझ्याशी बोलताहेत का माझ्याशी.

सुभद्राः अरे वेड्या, तुझ्याशीच बोलत आहेत तुझे बाबा. माझ्याशी कधी ते नीट बोलले? द्वारपालांना वाटत असेल अर्ध्या रात्री वीर अर्जुन लाडात येऊन आपल्या पत्नीला युद्धाची रणनीती सांगत असतील.

अर्जुनः कोणाशी बोलते आहेस तू, सुभद्रे? तुझं डोकं फिरलंय का?

कृष्णः (मागून अर्जुनावर टपली मारतो) तेरा तीर माश्याच्या डोळ्यात पोचवून माझ्या बहिणीशी तुझा विवाह करून दिलाय तो तिला घालूनपाडून बोलायला नाही. मी नसतो तर तेराच्या तेरा बाण तुझ्याच डोळ्यात घुसले असते. तुला महान बनवण्यात न जाणो किती लोकांचं बलिदान द्यावं लागलं...आणि ह्या वीरश्रींचा तोरा तर पहा!

सुभद्राः काय हो? तुम्ही हवेत बोललात तर ती रणनीती आणि मी बोलले तर वेडेपणा?

अर्जुनः हिला जागवत ठेव कृष्णा! युद्ध येईलच इतक्यात आणि घाईगडबडीत हा जन्म घेणार आहे. आता पुढची काही वर्षे केवळ युद्धाच्या तयारीत जातील. तेव्हा ह्याला शिकवायला फुरसत मिळणार नाही. ह्याला आताच काय शिकवायचं ते शिकवावं लागेल.

सुभद्राः हे बघा अर्जुन, तुम्हाला काय सांगायचं ते लवकर सांगून टाका. कुठल्याही परिस्थितीत आपला पुत्र वीर झालाच पाहिजे. नाहीतरी तुम्हा पांडवांची शूरता केवळ आपल्या आईबहिणीसाठी प्रतिज्ञा घेण्यापुरतीच काय ती राहिलीय.

कृष्णः		मी सांगतो ह्या अर्जुनाबद्दल! माझं कार्य तर महाभारताच्या अखेरच्या दिवसापर्यंत चालेल. ह्याला तर युद्धाच्या पहिल्या दिवशी सगळं थांबवून गीतेचा उपदेश पण करायचा आहे.

अर्जुनः		हां, तर मी चक्रव्यूहाविषयी बोलत होतो.

अभिमन्यूः	तुम्ही चक्रव्यूहात प्रवेश कसा करावा हे सांगत होता.

सुभद्राः		काय? काय सांगत होता?

अर्जुनः		चक्रव्यूह! चक्रव्यूह. इतका वेळ मी काय सांगत होतो?

अभिमन्यूः	आई, अगं मी ऐकलंय. ते सांगत होते की चार चक्र पार करून पाचव्या चक्रात प्रवेश करण्यासाठी तीन द्वार आहेत.

सुभद्राः		हां, तुम्ही तीन द्वारांविषयी काहीतरी बोलत होता.

अर्जुनः		हो हो, तीन द्वार, त्यातले एक बरोबर आणि दोन चूक. बरोबर ते ज्यामागे अजून दोन द्वार दृष्टीस पडतील. आणि चूक ते ज्यामागे केवळ एकच द्वार असेल.

(सत्यशील एकलव्याच्या भूमिकेत प्रवेशतो)

एकलव्यः	प्रणाम श्रीकृष्ण!

कृष्णः		हां, प्रणाम प्रणाम! घ्या, आता भर रात्रीत तुमचीच कमी होती.

एकलव्यः बाहेर कौमुदी बघितलीत आपण? अश्या कौमुदी रात्रीत...इतक्या सुंदर चंद्रप्रभेत... मला माझ्या झोपड्यात राहावेनासं झालं.

कृष्णः ए, निघ इथून! झोपड्यात राहवत नाही म्हणे. तू आता एकलव्याचं भूत आहेस. अशी मनुष्यांची भाषा बोलत जाऊ नकोस.

एकलव्यः महाराज मी जिवंत असताना कधी तुम्ही मला मनुष्यांची भाषा बोलू दिली नाही. मला जातीने शूद्र ठरवून ठार केलंत. तुमच्या जवळच्या लोकांना तर तुम्ही मोक्ष वगैरे प्राप्त करून दिलात आणि आपल्या जाळयात फसवलंत. पण मी शूद्र जातीचा. मला कसला मोक्ष? कसला धर्म आणि कसला देव? मी तर ह्या बालकाला भेटायला आलोय.



अभिमन्यूः हे गृहस्थ कोण आहेत, आई?

सुभद्राः (पेंगत) कोण गृहस्थ? हे तुझे बाबा आहेत. तुला काय होतंय अर्ध्या रात्री?

कृष्णः तर एकलव्याच्या भूता, तू ह्या बालकाला का भेटायला आला आहेस? मी आत्ताच त्याला चक्रव्यूह भेदण्याचे रहस्य समजावून देणार होतो.

एकलव्यः राहू द्या महाराज! खूप पाहिलेत मी चक्रव्यूह. शंभर लोकं मिळून एका व्यक्तीला घेरतील आणि म्हणतील चक्रव्यूह. ह्यात इतकं षडयंत्र कशाला? तुम्हा लोकांनी आपली भाऊबंदकी वाचवण्यासाठी प्रत्येक साधारण, सामान्य गोष्टीला भलीमोठी नावं देऊन ठेवलीयत. आणि आमच्यासारखे लोक त्यालाच घाबरत चालले आहेत.

कृष्णः हे बघ भिल्ला, मागच्या वेळी तुला दगड मारून सोडून दिलं होतं. ह्यावेळी जास्त बोललास तर...

एकलव्यः सोडून कसलं दिलं होतं, मारूनच टाकलं होतं की मला. माझा मृत्यू महाभारताच्या युद्धाआधी आपण घडवून आणलात आणि सर्वांना सांगितलं की कृष्णाच्या हाती ह्या शूद्राला मृत्यू येऊन त्याला मोक्ष प्राप्त झाला. हे मोक्षप्राप्ती, चक्रव्यूह, गीतोपदेश, हे सगळं तुम्हाला सुचतं कसं काय हो?

कृष्णः अर्जुना, तू चालूच ठेव. ह्या भिल्लाला मी बघतो.

अर्जुनः हां, तर मी म्हणत होतो की पाचव्या चक्रात..

सुभद्राः अहो झालं, शिरले पाचव्या चक्रात पुढे बोला.

अर्जुनः पाचव्यात शिरलात म्हणजे जवळजवळ आत पोचलातच.

एकलव्यः हां, त्याला सगळं सांगणार आहे का?

कृष्णः हो. का?

एकलव्यः	सगळं सांगितलं तर तुमचा पूर्ण डाव फसेल की. माझ्याकडून तर तुम्ही हिरावून घेतलात माझा ज्ञानप्राप्तीचा अधिकार पण अभिमन्यूला कसं रोखाल?

कृष्णः	तू काय वदलास ते मी समजलो नाही, भिल्ला.

एकलव्यः	महाराज, शुद्रांनी वदलेले आपणास एरवी ऐकू तरी कोठे येते, जे आता तुम्हाला समजेल? मी फक्त एवढंच म्हणू इच्छितो की अभिमन्यू अर्जुनापेक्षाही मोठा वीर आहे.

अभिमन्यूः	ही एक चांगली वार्ता आहे. कोण आहे हा गृहस्थ आणि ह्याचा अंगठा कुठे आहे?

एकलव्यः	आणि अर्जुनापेक्षा कोणी मोठा वीर व्हावा अशी तुमची तरी मुळीच इच्छा नाही. वीर बनण्यात आणि वीरगती प्राप्त होण्यात अंतर आहे महाराज. वीर तोच जो अंतापर्यंत जगेल. जो मृत झाला तो इतिहासाचं पान बनेल.

कृष्णः	दोघेही वीर होतील.

एकलव्यः	महाराज, जर दोघेही वीर होण्याची शक्यता असती तर महाभारतातील कितीतरी पात्रं वाचली असती. दोन वीरांचं कथानक आपल्या कल्पनेत आलंच नाही. तुम्हीदेखील जाणता महाराज की एवढ्या मोठ्या युद्धानंतर  एकतर अर्जुन वाचेल किंवा अभिमन्यू...दोघांचं वाचणं कथानकाला शोभा देणार नाही.

अभिमन्यूः	आई, हा बिनअंगठ्याचा गृहस्थ काय बोलतोय?

सुभद्राः कोण बिनअंगठ्याचा गृहस्थ?

कृष्णः भगिनी, वीरांना अशी दृष्टी प्राप्त होत असते. तू बघू शकत नाहीस पण इथे एकलव्याचं भूत आहे.

सुभद्राः कृष्णा! कोण आहे हा एकलव्य? तोच शूद्र भिल्ल का ज्यांनी काही बाण सोडून धनुर्विद्या शिकण्याचं धाडस केलं होतं? हे गुरू द्रोण पण अजागळच आहेत. मागायचंच होतं तर धड मागितलं असतं. अंगठा मागून काय मिळवलं? हा तेव्हापासून ह्यांच्या मागे लागलाय. आता काय हवंय त्याला?

एकलव्यः ध्यानात राहू द्या महाराज, आपल्यावर धर्मसंकट येऊ शकतं. कारण जिथे धर्म आहे, तिथे संकट तर आहेच. आता तुम्ही काय कराल?

कृष्णः अर्जुना...हे अर्जुना...तू ऐकलंस एकलव्य काय वदला ते?

अर्जुनः हो कृष्णा!

कृष्णः काय मत आहे तुझं?

अर्जुनः कशाबद्दल कृष्णा?

कृष्णः तुला तर काही विचारायचीच सोय नाही. अरे तुम्हा दोघांपैकी, म्हणजे तू आणि तुझ्या पुत्रापैकी, कुणीतरी एकटाच जिवंत राहू शकेल. कोणाला राखणं उचित ठरेल आणि कोण आपल्या प्राणाची आहुती देईल?

अभिमन्यूः ए मी नाही, बाबा देतील आहुती! ए आई तू सांग ना...

अर्जुनः हा फारच कठीण प्रश्न आहे कृष्णा.

अभिमन्यूः ह्यात कठीण ते काय? मी तर अजून जन्मच घेतला नाही तर मी कशी देईन आहुती?

अर्जुनः ह्या प्रश्नाचं काय बरं उत्तर असेल? पुत्र आणि पिता ह्यामध्ये मी कोणाची बरे निवड करावी?

कृष्णः हे अर्जुन..हे सर्व ब्रह्मांड दुःखाने व्यापलंय. दुःख आणि पीडा मानवाचे खरे सोबती आहेत. ह्या ब्रह्माण्डाचं दुःख कमी करणं माझं कर्तव्य आहे. ज्याने ह्या ब्रह्माण्डाचं दुःख कमी होईल तोच निर्णय उचित ठरेल.

अभिमन्यू; तर मग कोणत्या दुःखाची मात्रा कमी आहे? पुत्राचं कुमारावस्थेत अनाथ होणं की मातापित्याच्या वृद्धपकाळात पुत्राचं नसणं. तुम्हीच वदा हे सत्य मामाश्री. कसं कराल ह्या दुःखांचं मूल्यमापन?

कृष्णः (एकलव्याला) हे माझ्याने होणे नाही महाराज! जीवनाचं सत्य आपण माझ्यापेक्षा कैकपटीने अधिक जाणताहात. ह्याचं उत्तर आपणच वदा एकलव्य...आपणच सोडवा हे कोडं.

अभिमन्यूः हे एवढं मोठं सत्य हा अंगठा नसलेला शूद्र वदेल?

(सत्यशील अचानक स्थिर होतो. अंधार)

(फ्लॅशबॅक. समुद्राकाठचा आवाज. परितोष लहान मुलगा आहे.)

सत्यशीलः डोळे उघडू नकोस. कळलं का?

परितोषः बाबा, बाबा, मला ऐकू येतंय.

सत्यशीलः हा! काही वेळ फक्त ऐक. ऐक हा आवाज. (सत्यशीलही आपले डोळे मिटतो) पाण्याचा आवाज ऐक. (जरा पुढे जातो.) आता ये. एक एक पाऊल पुढे ये. (तिघे एक एक पाऊल पुढे येतात. हळूहळू पाण्यात येतात.) आता डोळे उघडा.

परितोषः (पाण्याला बघत) बाबा...

सत्यशीलः पृथ्वीवर तीन चतुर्थांश पाणीच आहे. (परितोष पाण्यात जायला लागतो.) अरे बाळा जपून. पुरे पुरे अजून आत नको जाऊस. (परितोष थांबतो. पाण्यात खेळायला लागतो) माझं खूप वर्षांचं स्वप्न होतं प्रभे, तुम्हा दोघांना इथं घेऊन यायचं. मी माझ्या वडिलांबरोबर यायचो इथे. असं अथांग पाणी बघितलं की मला

वेडंच लागल्यासारखं होतं. (उसासा टाकतो) हे सगळं तुझ्यामुळेच शक्य झालंय प्रभे. हे नटाचं अनिश्चित जीवन. तू नसतीस तर स्वतःचं घर असण्याचं स्वप्न कधी साकार झालंच नसतं. आईवडील गेल्यानंतर खूप एकटेपण आलं होतं आयुष्यात. तू नसतीस तर मी एक पूर्ण अभिनेता बनूच शकलो नसतो...निराशेच्या गर्तेत बुडून गेलो असतो केवळ. हा पुरस्कार तुझाच आहे प्रभे. एकलव्य तर मी करतच होतो. पुरस्कार कदाचित तसाही मिळाला असता. पण आयुष्य समजायला मला घराची गरज होती. ते तू दिलंस. हे घर, हा पुरस्कार, आपला परितोष....(समुद्राकडे बघतो. ओरडून) परितोष...

परितोषः (बुडताना) मी खूप खोलवर आहे बाबा. वर निळं पाणी. आणि त्यावर निळं आभाळ. तुम्ही माझ्यासाठी यायला पाहिजे होतं बाबा. एखाद्या मुलाला असंच वाटतं राहातं की अशा प्रसंगी त्याचे बाबा त्याला वाचवायला येतील.

सत्यशीलः मी आलो होतो तुला वाचवायला...मी किनाऱ्यापर्यंत आलो होतो.

परितोषः मला माहीत आहे बाबा. तुम्ही माझा हात पकडला होता.

सत्यशीलः हो, मी धरला होता तुझा हात.

परितोषः एका क्षणात इतिहास बदलतो बाबा. एका क्षणात सगळंच बदलतं.

सत्यशीलः मी तुला पकडलं होतं. आपली नजरानजर झाली. तुझ्या डोळ्यात तेव्हाही प्रकाश होता.

(परितोष आईचा हात पकडतो. आणि सत्यशील आईचा हात आपल्या दुसऱ्या हातात पकडतो)

सत्यशीलः दोघांना वाचवणं शक्य नव्हतं. अशक्य. पाण्याचा प्रवाह खूप जोरदार होता आणि मी क्षीण पडत चाललो होतो.

परितोषः तुम्ही माझा हात सोडलात पण मी तुमच्या डोळ्यातली हताशा पाहिली. आणि मी कसंतरी आईच्या पायाला पकडलं.

सत्यशीलः तू आईला नाही, एक शरीर पकडलं होतंस. मृत्यूच्या क्षणी प्रेम, वात्सल्य, ममता, पौरूष, समानता काहीच नसतं. मृत्यूच्या आधी आणि नंतर पुत्र पुत्र असतो आणि आई आई. मृत्यूच्या क्षणी फक्त शरीर असतं.

परितोषः नाही बाबा, मी आईला पकडलं. आणि तुम्ही एका झटक्यात मी आईच्या पायाला पकडलेला हात सोडवला.

सत्यशीलः मी खूपच क्षीण होत चालतो होतो आणि प्रवाह खूपच जोरदार. पण तुला जेव्हा बाहेर आणलं तेव्हा...

परितोषः मी कसा वाचलो मलाच माहीत नाही. आपल्या मुलाची हत्या तुमच्याकडून झाली नाही आणि आईला तुम्ही वाचवू शकला नाहीत.

सत्यशीलः मी खूपच क्षीण होत चालतो होतो आणि प्रवाह खूपच जोरदार...

(पाण्याचा आवाज वाढत जातो. सगळेच स्थिर उभे आहेत. परितोष उठून आईपाशी जातो. काही क्षणांनंतर सत्यशीलशी झटापट. आईच्या शवापाशी जाऊन हमसून रडतो. काही वेळाने सत्यशील परितोषपाशी जातो आणि रागाने त्याला ढकलून देतो. )

(लाईट बदलतात. परितोष परत अभिमन्यू बनतो. आणि सत्यशील एकलव्य.)

अभिमन्यूः हे एवढं मोठं सत्य हे अंगठा नसलेला हा शूद्र वदेल?

एकलव्यः कृष्णा, एवढं मोठं सत्य
तू एका शूद्राकडून जाणशील?

मृत्यू पुत्राचा झाला तर एक जीव मरेल
जर असेल अजून एक पुत्र..
मृत्यू मातेचा होईल
तर दोन जीव मरतील
जेव्हा माता मरेल, पुत्रही मरेल

निधन पावला जर अभिमन्यू
परीक्षिताचं असणं अनिवार्य आहे
पण जर अर्जुन पडला धारातीर्थी
तर मग ह्या कथानकाचा काय अंत आहे?

मनुष्य शोधतो एक कथानक

ज्यात आहेत पुनरावृत्तीची शक्यता
अभिमन्यूला झाली प्राप्त वीरगती
तर गादीवर बसेल परीक्षित
परंतु इतक्या षडयंत्रानंतरही
जर अर्जुन पडला धारातीर्थी
तर हे कृष्णा
ह्या कथेत काय बाकी राहील?
कुठल्या भ्रमावर जगेल मनुष्य?

ब्रह्मापासून चालतंय ब्रह्माण्ड
मनुष्य दुर्बळ विधीलिखित अटळ
महान राहायचं असेल तुला
तर मनुष्य दुर्बळच घडवशील

रक्ताचा भ्रम तू निर्माण केलास
तर रक्तापासूनच विधी घडवशील

दुःखाची मात्रा कितीही असली
कथानकात काय सांगशील?
हे कृष्णा
ह्या विश्वात मनुष्याला
आहे उणीव नायकांची
जर पडला अर्जुन धारातीर्थी
इतिहासाला कसा सामोरा जाशील?
जर पडला अर्जुन धारातीर्थी

इतिहासाला कसा सामोरा जाशील?

(काहीसा विराम. जोरदार टाळ्या. अंधार. सत्यशील उठतो. टाळ्या चालू असतानाच शेवटची दोन वाक्ये परत सादर करतो. अंधार)

(रंगमंचावर प्रकाश. सत्यशील ग्रीन रूम मधल्या खुर्चीवर बसला आहे. भोवताली पत्रकार आणि काही प्रेक्षक)

पत्रकारः सत्यशीलजी, अजून एक फोटो.

पत्रकारः आपला रंगमंचावरचा शेवटचा प्रवेश. कसं वाटतंय?

प्रेक्षकः आज आपण नवीन स्वगत बोललात. काय होतं ते? कोणी लिहिलंय?

प्रेक्षकः नाटक म्हणजे काय चेष्टा आहे का? शेवटच्या प्रयोगात पण नवीन काहीतरी करता आहात.

पत्रकारः तुम्हाला आता कितीसं दिसतंय सत्यशीलजी? म्हणजे स्टेजवर तुम्हाला बघून वाटत नव्हतं की तुम्ही...

पत्रकारः की तुम्ही अधू बनत चालला आहात. दैनिक लोकमतसाठी तुमच्या डोळ्यांचा एक एक्स्ल्युजिव फोटो द्याल का?

प्रेक्षकः मी माझ्या दोन्ही जुळ्या मुलांचं नाव सत्यशील ठेवलंय. एक मुलगा एक मुलगी.

प्रेक्षकः	नाटक म्हणजे काय? काय आहे नाटक? नृत्यातला 'न', आत्महत्येतला 'आ', टारझन मधला 'ट', आणि कुतुहलातला 'क'...जो खेळ नृत्यातून साकार होऊन, आणि ज्याच्यात अभिनेता आपली आत्महत्या करून भूमिकेत टारझनप्रमाणे घुसून एका संवादातून दुसऱ्या संवादावर उड्या मारेल आणि रसिकांच्या मनात कुतूहल जागृत करेल की हे काय चाललंय....ते नाटक.

सत्यशीलः	मी काय केलं..मी तर काहीच नाही केलं. माहीत नाही आज कोणी केलं.

पत्रकारः	कोणी केलं म्हणजे? तुम्ही नाही केलं? (इतर पत्रकारांना) अरे, हे म्हणतायत ह्यांनी नाही केलं. तर मग कोणी केलं? ह्याच्यात परकीय देशांतील शक्तीचा हात आहे असं तुम्हाला वाटतंय का?

सत्यशीलः	नाही, माझ्या म्हणण्याचा मुद्दा तो नव्हता. मी केवळ असं म्हणत होतो की आज मी होतो आणि नव्हतो पण.

प्रेक्षकः	काही नाही. होतं असं उतारवयात. तुम्ही जर माझ्या मुलासोबत एक फोटो काढलात तर खूप मेहेरबानी होईल. त्याचा स्कूल प्रोजेक्ट आहे.

पत्रकारः	तर सत्यशीलजी, तुम्हाला आता कितपत दिसतंय? म्हणजे अंदाजे किती टक्के?

सत्यशीलः	हे बघा, मला आता थोडा आराम करू द्या.

युवा अभिनेता१ः सर, तुम्ही मला आंधळेपणाचा अभिनय कसा करावा हे शिकवाल? मी (कान पकडून) पंडित दत्तारामजी, श्रीमती सरोजिनी शिरोडकर, पंडित सतीश वाडीकर, पंडित मधुकर भोळे, आणि जॉन फर्नांडिस ह्यांच्याकडून अभिनयाचे धडे घेतले आहे.

युवा अभिनेता२ः सर, मला स्टॅनिस्लावस्कीयन पद्धतीत घुसून त्याच्यात तमाशा आणि दशावताराची अंगे घेऊन मेयरहोल्डच्या थियरीशी ब्रेख्तच्या एलियनेशनचं किती साधर्म्य आहे त्याचा अभ्यास करायला आवडेल. तुम्ही शिकवाल का मला?

पत्रकारः सगळं ठीक आहे पण तुम्ही एका वाक्यात सांगू शकाल की एकलव्य आणि अभिमन्यूच्या आपसातल्या द्वंद्वापासून जी पीडा उत्पन्न होते आणि त्याच्यात जे रस आणि भाव ह्यांचं मिश्रण आहे त्या मिश्रणाची प्रक्रिया करण्यासाठी तुम्हाला कुठले रस आणि भाव कामी येतात? आणि त्याच्यात तुमच्या व्यक्तिगत आयुष्याचा किती प्रभाव आहे? कृपया एका वाक्यात सांगा जागा कमी आहे.

(अंधार)

(सत्यशील आपल्या खोलीत बसलाय. परितोष येऊन सत्यशीलपुढे उभा राहतो. त्यांच्या औषधाची बाटली घेऊन आरश्यावर ओततो. सत्यशील काहीच बोलत नाही.)

परितोषः हे ढोंग का करताहात आपण? (स्तब्धता) काय मिळेल तुम्हाला ह्यात? किंबहुना काय मिळायचं बाकी आहे? आपण एक कलाकार आहात. थोडीशी इमानदारी दाखवली तर काय जाईल तुमचं? सत्यशील...नाव सत्यशील आहे तुमचं..पण कवडीभर तरी सत्य आहे का तुमच्यात? काय हवंय तुम्हाला? आपल्या भूमिकेशी काहीच घेणंदेणं नसलेले संवाद आणि युक्तिवाद देऊन इतर कलाकारांना कमी

लेखण्यात कसला आनंद मिळतो तुम्हाला? लोकांना हे नाटक खडान् खडा पाठ आहे. आणि तुम्ही त्यात स्वतःचे नवीन संवाद...कधीतरी खरं वागा...निदान प्रयत्न तरी करा.

सत्यशील: इतक्या वर्षांने भेटलायस आणि एवढा क्रोध?

परितोष: आपण हे ढोंग का करता आहात?

सत्यशील: मी आंधळेपणाचं ढोंग करत नाहीये. कदाचित इतके दिवस मी डोळसपणाचं ढोंग करत होतो.

परितोष: वाह! प्रत्येक गोष्टीवर तुमच्यापाशी काही हजरजबाबी उत्तर आहेच. मी इथे तुमच्याशी माझं नातं सांधायला आलेलो नाहीये. मी माझं काम करायला आलो आहे. तुम्ही एक कलाकार आहेत आणि मीही एक कलाकार आहे. तुम्ही तुमचं काम करा आणि इतरांना त्यांचं काम करू द्या.

(परितोष निघू लागतो )

सत्यशील: तुला नाही वाटत एका आईचं नसणं एका पुत्राच्या नसण्यापेक्षा अधिक दुःखद आहे?

परितोष: एखादा पुत्र जन्मापासून आपल्या मात्यापित्यावर विश्वास ठेवतो, त्याला जाणूनबुजून मृत्यूच्या दाढेत ढकलणं चूक आहे असं नाही वाटत तुम्हाला? ह्यात तुम्हाला कुठलाही विश्वासघात दिसत नाही? अभिमन्यूच्या मृत्यूनंतर सुभद्रेचं काय झालं असेल ह्याचा विचार केलाय कधी? अर्जुनापाशी तर इतरही संधी होत्या स्वतःची

महानता सिद्ध करायला. पण सुभद्रेचं आपलं असं कोण होतं? माता जिवंत असताना पुत्राच्या मृत्यूचा शोक किती गंभीर आहे इतकही तुम्हाला समजू नये?

सत्यशीलः तू गेली काही वर्षे अभिमन्यूचीच भूमिका केलीयस म्हणून कदाचित तुला ही गोष्ट समजत नसावी.

परितोषः आणि तुम्ही इतकी वर्षं एकलव्याची...तुमचा पण काही व्यक्तिगत संपर्क राहिलेला नाहीये महाभारतात कोणाशीही...तुमच्यासाठी संपूर्ण महाभारत एक धोका आहे. एक स्वार्थी विचार. कोण जगेल कोण मरेल ह्याच्याशी तुम्हाला काही घेणंदेणं नाहीये. तुम्ही केवळ स्वतःबद्दलच विचार करू शकता. तुमचं प्रेमदेखील तुमच्यापुरतंच आहे. सत्यशीलजी....तुम्ही केवळ कलाकारच बनला, त्या व्यतिरिक्त इतर काहीच बनू शकला नाही.

सत्यशीलः मी एकलव्याबद्दल बोलत होतो. स्वतःबद्दल नाही.

परितोषः नाही. तुम्ही केवळ तुमच्याबद्दलच बोलत होता. किंबहुना, आजपर्यंत तुम्ही तुमच्याबद्दलच बोलत आला आहात. तुम्हाला तुमच्यात आणि एकलव्यात काहीएक फरक करता येत नाही. म्हणूनच कदाचित तुम्ही एकलव्याचं पात्र करायला सक्षम आहात. कारण तुम्ही कधी एकलव्य साकार केलाच नाही. एकलव्याच्या वेषात सत्यशीलच साकार केलात आजपर्यंत.

सत्यशीलः प्रत्येक कलेत कलाकार तेच करतो. तूदेखील तेच करतोयस.

परितोषः	नाही. किंबहुना जाणून बुजून तर मुळीच नाही. तुमचे आईबाप तुमच्या लहानपणी वारले ह्यात प्रेक्षकांचा काय दोष? ह्यात आईचा, माझा, मॅनेजरसाहेबांचा काय दोष? एक शोक, एक दुःख सगळेच इथे लिहून येतात. शोक माणसाला घडवतो. पण त्यासाठी माणूस असणं गरजेचं आहे.

सत्यशीलः	तुझ्यातला हा क्रोध, हा क्लेश तुझा स्वतःचा नाही.

परितोषः	नसेल. पण तो रंगमंचावर जात नाही. मी माझ्या व्यक्तिगत आयुष्यात काहीही करेना, रंगमंचावर मी काहीतरी वेगळा बनायला जातो.

सत्यशीलः	मंचावर आपण सगळे स्वतःला शोधायला जातो.

परितोषः	मंचावर आपण आपलं पूर्ण रूप शोधायला जातो, आपला अहंगंड नाही. प्रेक्षक आणि कलाकार इथं शोधत येतात एकलव्यात सत्यशीलाची शक्यता... सत्यशीलातील एकलव्याच्या निश्चिततेला नाही.

(मॅनेजर आत येतो. स्तब्धता. परितोष निघायला लागतो.)

मॅनेजरः	एक मिनिट थांबा परितोषजी! सर्वात आधी मी तुमचा एक गैरसमज दूर करू इच्छितो. मी तुमच्यासाठी नाही..तुम्ही दोघे माझ्यासाठी काम करत आहात. आणि मी काम करतोय रंगमंचाच्या व्यवसायासाठी. आणि हा व्यवसाय तुमच्या व्यक्तिगत तत्त्वांनी चालत नाही. माझ्या मनात आलं तर ह्या दीनानाथ थेटरात उद्या मी कुठल्या बाईचा नाच जरी ठेवला..तर तेव्हाही माझ्या थेटरात गर्दी असेल. इथे जर खरंच

कोणाला रंगभूमीच्या भविष्याची चिंता असेल तर ती ह्या थेटराच्या मॅनेजरला आहे. कलाकारांना नाही.

सत्यशीलः मला माफ करा, मॅनेजर साहेब.

मॅनेजरः (परितोषला एक फडकं देतो.) हा आरसा विकत घेण्यासाठी कित्येक महान अभिनेत्यांचे श्रम खर्ची गेले आहेत. कितीतरी नाटककाराचे शब्द झिजले आहेत जे अमूल्य आहे. थिएटरमध्ये आपला राग स्वतःवर काढा, थिएटरातल्या सामानावर नाही. ह्या वास्तूत सगळ्यात कमी किंमत माणसाची आहे आणि सगळ्यात जास्त त्याच्या कामाची.

परितोषः तुम्ही माझ्याशी असं वागू शकत नाही.

सत्यशीलः तो कपडा द्या मी साफ करतो.

मॅनेजरः साफ तर तुम्हालाच करावं लागेल, परितोषजी. आणि मी अगदीच तुमच्याशी असं वागू शकतो. तुम्ही माझ्या थेटरात आहात. मी तुमच्या घरी नाही.

परितोषः तुम्ही इथं केवळ काम करता. हे तुमचं नाही.

मॅनेजरः हे माझंच आहे. हे थिएटर त्या प्रत्येक व्यक्तीचं आहे जी आपला कामधंदा सोडून संध्याकाळी तुमचं ढोंग बघायला इथं येते. आणि आदर्शरूपानं हे थिएटर तुमचंही असलं पाहिजे. पण तुमच्यात गर्वाची मात्रा एवढी आहे की त्यात इतर कशासाठीच तुमच्यात जागा नाही. आपण एकलव्य किंवा अभिमन्यू व्हाल अथवा न व्हाल. पण

सर्वात आधी तुम्ही हा आरसा साफ कराल. आणि तो जर करायचा नसेल तर तुम्ही आत्ताच जाऊ शकता.  माझ्या इतर कलाकारांनी आजपर्यंत केलेल्या मेहेनतीचं महत्त्व समजू न शकणाऱ्या कुठल्याही महानतेची गरज मला दीनानाथात नाही...

सत्यशीलः मी आपल्या भूमिकेबाहेर संवाद बोललो ते काही जाणूनबुजून केलं नाही, मॅनेजर साहेब. मी हेही जाणून आहे की आजपर्यंत कुठल्याही एकलव्याने ह्या ओळी म्हटल्या नाहीयेत. पण ही निश्चितच एकलव्याची विचारधारा असू शकते. मी इतर कलाकारांना कमी लेखण्यासाठी नवीन संवाद म्हणत नव्हतो.

मॅनेजरः माहीत आहे मला. अविनाश पण हेच म्हणत होता की आज सत्यशील जरा वेगळेच वाटत होते. पण उद्या वेगळं असेल. तुम्ही वेगळे तेव्हाच बनू शकता जेव्हा तुम्ही त्याची चेष्टा करत नाही.

सत्यशीलः उद्या तर अभिमन्यू दुर्योधनासोबत युद्ध करेल. आणि त्याला पराजयापाशी घेऊन जाईल. एकलव्याचं काम तसंही कमीच आहे उद्या.

मॅनेजरः कोणाचंच काम कमी जास्त नाहीये. दुर्योधनाला पराजयापाशी अभिमन्यूच नव्हे तर आम्ही सगळे मिळून घेऊन जाणार आहोत. फक्त तुम्ही, परितोष, अविनाश आणि इतर पात्रंच नव्हे तर इथं काम करणारी प्रत्येक व्यक्ती, इथे तिकीट विकणारे, प्रकाशयोजना करणारे, स्टेज साफ करणारे. सगळेच. आपण दोघांनी हे लक्षात ठेवणं उचित होईल की नाटकात प्रामुख्यानं तुम्हीच असाल पण ह्या खेळात इतरही लोक आहेत.

(विराम)

मला अजून कामं आहेत. मी निघतो. मी रात्री आरसा बघायला येईन परितोष जी.

(मॅनेजर जातो. स्तब्धता. परितोष आणि सत्यशील दोघेही बसलेत. परितोष उठतो. आरसा पुसू लागतो.)



सत्यशीलः नीतीचा आज पहिला प्रश्न. मृत्यूच्या नीतीचा. उद्या प्रतिज्ञेचा आणि परवा कलेच्या नीतीचा. नीतीचे केवळ तीन स्तंभ. प्राण, प्रतिज्ञा आणि कला. हे सभ्य जीवनाचे तीन पैलू आहेत ज्याविषयी विचार किंवा विमर्श फक्त सुशिक्षित माणूसच करू शकेल. दीनानाथात हे नाटक करणं बलवंतात करण्याइतकं सोपं नाहीये.

परितोषः	मी नीतीसाठी नाही खेळासाठी नाटक करतो. जो नीतीसाठी नाटक करतो तो नीती आणि खेळ ह्या दोघांचा घात करतो असं माझं मत आहे.

सत्यशीलः	आणि ही तुझी स्वतःची नीती आहे. आपल्या बापापासून तू लपून छपून केवळ अभिनयच नाही तर नीती बनवणंही शिकलास तर.

परितोषः	मी तुमच्याकडून काहीही शिकलेलो नाहीये. जे काही शिकलोय ते स्वतःच शिकलोय.

सत्यशीलः	उद्या मी तुला माझ्या युक्तीवादाच्या विरुद्धही मत देऊ शकतो. तुला हे जाणणं आवश्यक आहे की तू स्वतःच्या क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक जोखमीचं काम हाती घेतलंय. अभिमन्यू कोणीही करू शकतो. त्या पात्राला स्वतःचं असं काही अस्तित्व नाहीये. त्याच्या परिस्थितीशिवाय. ना स्वतःचं आंतरिक द्वंद्व ना काही विकल्प. त्याची जेवढी म्हणून ख्याती आहे ती फक्त सत्यशीलच्या एकलव्यासोबत उभी राहण्यात आहे. त्याला केवळ टिकायचं श्रेय मिळेल कारण सगळ्यांनाच ज्ञात आहे की तो तिसऱ्या रात्री मरेल. माझ्यानंतर तू इथं येशील. माझी भूमिका करशील. कसाही असलास तरीही माझा मुलगाच आहेस. जर मी मागच्या अभिमन्यूची लाज राखू शकतो तर तुझी थोडीफार काळजी करू शकतोच की. नाहीतर तुला माहीत असेलच की तुझं काय होईल. तीन दिवसानंतर लोक तुला नाकारतील. आणि असं झालं तर रंगभूमीच्या इतिहासात तुझं भविष्य काहीच उरणार नाही. बोल, तुला हवं असेल तर सत्यशीलाचा एकलव्य तुझी मदत करू शकतो. मी वाचवू शकतो तुझं भविष्य.

परितोषः सत्यशीलजी, तुम्ही खूप उदार आहात. खूप ज्ञानी देखील आहात. तुम्ही एकलव्याच्या भूमिकेवर कसून अभ्यास करा कारण बरंवाईट का असेना माझं भविष्य अनिश्चित आहे. पण तुमचं निश्चित. अजून दोन रात्रीनंतर तुमचं नाव ह्या थिएटरातल्या भूतामंध्ये दाखल होईल. 'सत्यशील किती महान आहे' ह्या प्रेक्षकांच्या भ्रमाला तोडणं तुम्हाला आवडणार नाही. ह्या प्रेक्षकांनी शेवटी बघितलं तरी काय आहे की त्यांची कल्पना तुमच्यापलीकडे असेल. तुम्ही तुमच्या एकलव्यावर जरा अधिक लक्ष द्या. कदाचित तोच तुम्हाला वाचवेल. आपल्या तरुणपणात आपल्या पत्नीला वाचवता आलं नाही, म्हातारवयात अभिमन्यूला तरी काय म्हणून वाचवाल?

(अंधार)

**अंक दुसरा**

(स्टेजवर काळोख. अचानक किंचित प्रकाश येतो. दुर्योधन आणि अभिमन्यू येतात.  हातात चिकन तंगडी आणि दारूची बाटली. )

दुर्योधनः अभिमन्यू..अरे अभिमन्यू...उद्या मला मारशील ना? बघ, उद्या मारायचं मला.

अभिमन्यूः नाही काका..

दुर्योधनः अरे! मी आदेश देतो तुला. मला मारायचं. उद्या. इथे.

अभिमन्यूः काका, काका रिकामं थेटर किती छान वाटतं नाही?

दुर्योधनः मी तर म्हणीन रिकामंच छान वाटतं.

अभिमन्यूः हां, लोक येताहेत हे चांगलंच आहे. बरं झालं मी नाटकातलं पात्र आहे. इतर कशातलं असतो तर किती लोक आले असते?

दुर्योधनः माझे तर नव्याणव भाऊ होते. आता दोनाच्या वर लोक एकत्र दिसले की चक्कर येते.

अभिमन्यूः काका, तिथे बसून कसं वाटत असेल?

दुर्योधनः जा बघ ना, मी इथे काहीतरी करतो तू बघ.

(अभिमन्यू  जाऊन प्रेक्षकांत बसतो. दुर्योधन सत्यशीलची नक्कल करतो. अभिमन्यू हसतो.)

दुर्योधनः ए टाळ्या वाजव की! (अभिमन्यू टाळ्या वाजवतो. )

अभिमन्यूः काका चांगले दिसताहात तुम्ही इथून. आणि वेगळे पण.

दुर्योधनः असं? कसं काय?

अभिमन्यूः म्हणजे..आकाराने जरा मोठे दिसताय.

दुर्योधनः जागा मोठी आहे म्हणून असेल कदाचित.

अभिमन्यूः हो, कोंबडी पण मोठी वाटतेय.

दुर्योधनः तुला सांगितलं होतं अभिमन्यू की आपण हरियाणाचे आहोत. गोव्याची पिऊ नकोस. आता काय भलतंसलतं दिसून राहिलं तुला?

अभिमन्यूः ओ काका! मुद्दा तो नाहीये. मी विचार करतोय की हे इतके सारे लोक काय बघायला येतात इथे?

दुर्योधनः इथे ये. (अभिमन्यू वर जातो.) आता काहीतरी कर.

अभिमन्यूः काय करू?

दुर्योधनः काहीही कर. (अभिमन्यू सत्यशीलची नक्कल करतो. दुर्योधन हसतो.) रंगमंचावर सगळं आकाराने मोठं वाटतं पण इतकी मोठी काही गोष्ट नाहीये. कारण?

अभिमन्यूः किंवा सगळंच आकाराने मोठं आहे पण ते फक्त आपल्याला रंगमंचावर पाहिल्यानंतर ज्ञात होतं.

दुर्योधनः समज स्टेजवर महाभारत करायचंय...करू शकतो?

अभिमन्यूः एकदम.

दुर्योधनः संपूर्ण कुरुक्षेत्र दाखवू शकतो?

अभिमन्यूः हो, दाखवू शकतो.

दुर्योधनः आणि जर एक घर दाखवायचं असेल....एकच खोलीचं..कोण्या एका गरिबाचं..तर?

अभिमन्यूः दाखवू शकतो.

दुर्योधनः मुंगी आणि हत्तीची गोष्ट?

अभिमन्यूः दाखवू शकतो.

दुर्योधनः संपूर्ण ब्रह्माण्डात..बरं का..संपूर्ण ब्रह्माण्डात उडणारी एक....कोंबडी

अभिमन्यूः	अरे, ते पण होऊन जाईल.

दुर्योधनः	काय रे? इथे समोर बसल्यानंतर लोक काय च्युतिया बनतात का? काहीही कसं मानून घेतात?

अभिमन्यूः	ह्या सत्यशीलात लोक काय बघायला येतात?

दुर्योधनः	आम्हाला.

अभिमन्यूः	पण आम्हाला बघायला कोणीच येत नाही.

दुर्योधनः	हेच मला कळत नाही. साला आम्हाला बघायला कोणी येत नाही पण सत्यशीलात आम्हाला बघायला येतात.

अभिमन्यूः	कलियुग आहे काका. दुसरं काय म्हणणार? हा एकलव्य कोण आहे काका?

दुर्योधनः	माहीत नाही. मला माझ्याच भावांची नावं कधी कधी आठवत नाही. तुमच्याबाजूने कोणी होता का?

अभिमन्यूः	नाही. आमच्याबाजूने नाही.

दुर्योधनः	छोटं पात्र असेल.

अभिमन्यूः तर एवढा काय कल्ला आहे त्याच्या नावाने?

दुर्योधनः बोट बिट कापलं होतं असं म्हणतात.

अभिमन्यूः घ्या! इथे किती लोकांचे हात, पाय, धड कापले गेले तरी कोणाची पर्वा नाही आणि ह्याचं बोट कापलं तर एवढं काय?

दुर्योधनः वरच्या जातीतला असेल.

अभिमन्यूः आपल्यापेक्षा?

दुर्योधनः हां! एखादा ब्राह्मण?

अभिमन्यूः ब्राह्मणांची नावं मला मुखोद्गत आहेत.

दुर्योधनः मुखोद्गत? एवढी शुद्ध भाषा? हा सत्यशील आमच्या भूमिका करताना एवढ्या शुद्ध भाषेत का बोलतो?

अभिमन्यूः हिंदू ब्राह्मण लोक येतात नाटक बघायला. आपण अशुद्ध भाषेत बोललो तर त्यांच्या भावना दुखावतात म्हणे.

दुर्योधनः भें...हा ते एकलव्याविषयी माहिती काढावी लागेल. कोण आहे हा.

अभिमन्यूः सत्यशील मोठा कलाकार बनला कारण त्याला मोठं पात्र साकार करायला मिळालं. हा एकलव्य जो कोण आहे...मोठं पात्र आहे.

दुर्योधनः आम्हाला जर कोणी ह्या अवस्थेत बघितलं तर काय होईल?

अभिमन्यूः विश्वास ठेवणार नाही.

दुर्योधनः अरे ठेवतील. इथं बसल्यावर ते कशावरही विश्वास ठेवतील.

अभिमन्यूः काका समजा जर मी तुम्हाला उद्या मारलं....

दुर्योधनः तर महाभारताच्या शेवटी काय दुःशासनाचं गर्वहरण करशील?

अभिमन्यूः तर मग इतकी वर्षे मी ह्या नाटकात तुमच्याशी का लढतोय?

दुर्योधनः तू लढतोयस कथानकासाठी. कारण इथे येणाऱ्या प्रत्येकाला एक कथानक हवंय ज्यापासून त्याला पुढील जीवन जगण्याची प्रेरणा मिळेल. एक सरळ सोपं कथानक. ज्यात न्याय विजयी होईल आणि अन्याय पराजित होईल. पाप करणारा अंततः मरेल आणि पुण्य करणाऱ्याला मोक्ष प्राप्ती होईल. इथे लोक येतात शोधायला तीन प्रश्नांची उत्तरे. तीन प्रश्न जे समग्र मनुष्यजातीला ग्रासून आहेत. कोणाचा मृत्यू उचित आहे? कुठली प्रतिज्ञा अटळ आहे? आणि मनुष्य कलेला बनवतो का कला मनुष्याला घडवते?

अभिमन्यूः पण सत्यशीलाला तरी कुठे ठाऊक आहे ह्या प्रश्नांची उत्तरं?

दुर्योधनः उत्तरं ज्ञात झाली तर हा खेळ बंद नाही का होणार? इथे रात्री बघ किती शांत वाटतं. मला रिकाम्या खुर्च्या पाहून खूप छान वाटतं. मॅनेजरला आवडत नाही. सत्यशीलला पण रिकाम्या खुर्च्या आवडत नसत. पण आता तर त्याला घंटा कळत असेल किती खुर्च्या रिकाम्या आहेत आणि किती भरलेल्या. प्रत्येक कथानक ही लोकं आपल्या मितीतून बघतात. आपली मिती ही आहे. पडद्याच्या वरून. ग्रीन रूमच्या आत. इतर भूतांबरोबर. उद्या तू मला मारणार नाहीस. मला खात्री आहे. आणि हे ह्यांनापण पुरेपूर माहीत आहे. आणि तरीही, उद्या पुन्हा खुर्च्या भरतील. ही लोकं दुबळी आहेत. त्यांना जे माहीत आहे तेच बघायला ते येतील कारण ते विसरण्याची त्यांना सतत भीती आहे. दुबळ्या लोकांसाठी करतो आपण नाटक.

(मध्यरात्र. सत्यशील नदीकाठावर उभा आहे. पाण्याचा आवाज. मॅनेजर धावत येतो. थोड्याश्या पेंगुळलेल्या अवस्थेत. सत्यशील हळूहळू पाण्याशी जातो. एक कुत्रा त्याच्यासोबत आहे. कुत्राही पाण्यापाशीच थांबलेला आहे. सत्यशील त्याच्या पट्ट्याला ओढून त्याला पाण्यात न्यायचा प्रयत्न करतो आणि घाबरून गेलेला कुत्रा पाण्याबाहेर जायचा प्रयत्न करतोय.)

मॅनेजरः सत्यशीलजी, सत्यशीलजी, तुम्ही...(त्याच्यापाशी पोचत ) थांबा, सत्यशील जी कुठे चालला आहात आपण?

सत्यशीलः (थांबतो पण मागे वळून बघत नाही. ) तुम्ही आलात...

मॅनेजरः मुरारी म्हणाला तुम्ही मला शोधताहात. इतक्या रात्री काय झालं असेल ह्या विचारानेच मी घाबरलो. म्हणून पळत इथं आलो. सगळं ठीक आहे ना?

सत्यशीलः मला पाण्याबाहेर घेऊन चला.

मॅनेजरः अं हो!

(मॅनेजर सत्यशीलला बाहेर काढतो. सत्यशील घाटावर बसतो. कुत्रा पूर्णपणे ओला.)

सत्यशीलः माझं घर दिसतंय तुम्हाला? ते बघा तिथं. तुम्हाला ठाऊक आहे मी माझं घर इथं, नदी काठाजवळ, का  बांधलं? (स्तब्धता) कारण मला घरून दीनानाथ नजरेस पडावं, माझ्या खिडकीतून माझं थियेटर मला दृष्टीस पडावं ह्यासाठी. ही मांडवी. एका तीरावर माझं घर तर दुसऱ्या तीरावर माझं थियेटर. आणि हे एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंतचं अंतर मी रोज एका नावेत बसून पार करतो. त्या प्रवासात सतत एक भीतीचा मी सामना करतो. माझ्या जीवनात मला सगळ्यात जास्त  भीती ह्या नावेतल्या प्रवासाचीच वाटत राहते. पण तरीही मी दररोज नावेनेच इथे येतो. का माहित आहे? (स्तब्धता. सत्यशील कुत्र्याला खुणेने बोलावतो.) कारण कुठल्याही कलेत भीती, भय असणं आवश्यक आहे. कुठल्याही कलेच्या गूढ तळापाशी जाण्यासाठी मनुष्याने आपल्या आत दडलेल्या भयाचा सामना केला पाहिजे. तरच त्याच्या कलेत रंग अधिक गहिरे उमटतात.

मॅनेजरः अं हो!

सत्यशीलः ह्या मुलात ती भीती नाहीये.

मॅनेजरः म्हणजे?

सत्यशीलः परितोष कुमार. त्याच्यात ह्या भयाचा अभाव आहे. भीती नाहीये त्याच्यात. आणि म्हणूनच तो तेवढाच उथळ आहे.

मॅनेजरः परितोष एक प्रसिद्ध अभिनेता आहे.

सत्यशीलः आपल्या देशात प्रसिद्ध होणं फारसं अवघड नाहीये मॅनेजर साहेब! पण आपल्या कामात सक्षम असणं फारच कठीण आहे. हा मुलगा सक्षम बनू शकणार नाही. आपल्यातली भीती आणि दुर्बलता तो खूप मागे सोडून आलाय आणि म्हणूनच तो जे काही करेल, उथळच करेल. तळ गाठू शकणार नाही. (स्तब्धता) मी त्याच्यासोबत स्टेजवर जाणार नाही. माझ्या रंगभूमीवरील कारकिर्दीच्या शेवटच्या दोन रात्री मला एका भोंदू अभिनेत्यासोबत घालवायच्या नाहीयेत. माझ्या प्रेक्षकांप्रती माझं काही उत्तरदायित्व..

मॅनेजरः हे काय बोलताय तुम्ही सत्यशीलजी. नाटक सुरु झालंय. लोक यायला निघालेत. आणि तुम्ही..आता शेवटच्या क्षणाला...कसं काय?

सत्यशीलः सतीशला बोलवून आणा. नाहीतरी ही भूमिका तोच करत होता. उद्यापासून दीनानाथला ह्या नवशिक्या कलाकाराची काहीच गरज नाही.

मॅनेजरः जर तुम्ही असं केलंत तर त्याला पुढे कोण काम देईल..त्याचं भविष्य..

सत्यशीलः त्याचं भविष्य अंधकारमयच आहे. त्याने अभिनय करण्याचा नाद सोडून देणं हे त्याच्यासाठी आणि एकूणच रंगभूमीसाठी चांगलं आहे.

(कुत्र्याचा पट्टा सोडतो. पाण्यात काहीतरी फेकून कुत्र्याला पाण्यात जायची खूण करतो पण कुत्रा जात नाही. परत एकदा तेच करतो. कुत्र्याला लाथ मारतो. कुत्रा घाबरून दोन पावलं जातो आणि घाबरून परत मागे फिरतो.)

तर उद्यापासून...

मॅनेजरः हा कुत्रा तुम्ही पाळलाय?

सत्यशीलः (हसतो) तसं म्हणा हवं असल्यास. एक दिवस घराबाहेर येऊन बसला. तेव्हापासून मी त्याला ठेवून घेतला.

मॅनेजरः किती वर्षे झाली हा पाण्यात जायला घाबरतो?

सत्यशीलः बराच काळ. आठ दहा वर्षे तरी झालीच असतील.

मॅनेजरः माझ्या घरी पण एक कुत्रा होता. नदीकाठी यायचा तेव्हा वेड्यासारखा पाण्यात जायचा. कुत्र्यांना एरवी पाण्यात खेळायला खूप आवडतं.

सत्यशीलः ह्याला आवडत नाही.

मॅनेजरः ते चांगले पोहू पण शकतात.

सत्यशीलः मी तुम्हाला मध्यरात्री कुत्र्यांवर चर्चा करायला बोलावलेलं नाहीये मॅनेजर साहेब.

मॅनेजरः सत्यशीलजी, मला ह्या कुत्र्याची जरा चिंता वाटली म्हणून म्हणालो. एखादं जनावर कुठल्याही गोष्टीला घाबरून जाणं मी समजू शकतो पण जे आपल्या स्वभावालाच घाबरून जातं त्याचं घाबरणं हे केवळ एक लक्षण आहे...एका मोठ्या गंभीर समस्येचं.

(स्तब्धता)

सत्यशीलः तो माझा मुलगा आहे.

(सत्यशील कुत्र्याला परत एकदा पाण्यात सोडायचा प्रयत्न करतो)

मॅनेजरः मला वाटलं होतंच. बऱ्याच आधीपासून वाटलं होतं. तेव्हाच मी तुम्हाला विचारलं होतं पण तुम्ही काही विशेष बोलला नाही तेव्हा मी बोलावण्याचा निर्णय घेतला.

सत्यशीलः मी काय बोललो असतो? शेवटी माझाच मुलगा आहे. मलापण वाटत होतं त्याला अजून एक संधी मिळावी. पण आता त्याला तुम्ही जाऊ द्या. तो ह्या लायक नाहीये.

मॅनेजरः मला माफ करा सत्यशील जी पण आज ह्या क्षणी तो केवळ तुमचा पुत्र नाहीये. दीनानाथ थेट्राचा कामगार पण आहे. आणि त्याचं भविष्य माझ्यासाठी मोलाचं आहे. क्षमा असावी.

सत्यशीलः त्याचं भविष्य दीनानाथाच्या भविष्याहून मोठं आहे तुमच्यासाठी?

मॅनेजरः नाही. पण मी दोन भविष्यामध्ये दुकानदारी करू इच्छित नाही. मी नाटकाचा व्यवसाय जरी सांभाळत असलो तरी कला आणि दुकानदारीमधला फरक मी समजतो. हे माझ्याने होणे नाही.

सत्यशीलः तर मग तुम्ही हेही समजत असाल की मी जर उद्या नाही आलो तर काय होईल?

मॅनेजरः तुमचा कुत्रा तुम्हाला बघतोय.

सत्यशीलः मी काहीतरी विचारतोय तुम्हाला.

मॅनेजरः हां, तुम्ही उद्याबद्दल काही बोलत होता.

सत्यशीलः मी जर उद्या नाही आलो तर काय होईल हे तुम्हाला माहीत आहे ना?

मॅनेजरः तुम्ही तुमचा वेळ ह्या इमानदार कुत्र्यासोबत व्यतीत कराल.

सत्यशीलः माझं नाही पण दीनानाथचं काय होईल?

मॅनेजरः उद्या..हं. कठीण जाईल. त्रास होईल. लोकं चपला पण फेकून मारतील. कदाचित ते परत जातील. माहीत नाही. काहीही होऊ शकतं. पण उद्या संध्याकाळपर्यंत माझ्याकडे एक थियेटर, १८ तास आणि काही कलाकार आहेत...तुमच्यापेक्षा खूप कमी ताकदीचे पण असे कलाकार ज्यांना नाटक करायचंय. काहीतरी होईलच सत्यशीलजी. जमल्यास इथे बसून तुम्ही ऐका. तुमचे कान तुमचे चांगले मित्र बनलेत. मी तुमच्याकडूनच एक गोष्ट शिकलोय सत्यशील जी. ती ही की रंगभूमीची

कोणीही देवता नाही. ती स्वयंभू आहे. या कुत्र्याची काळजी घ्या. तुमची दृष्टी अधू होत चालती आहे आणि तुम्ही पाण्याच्या एकदम जवळ आहात.

(मॅनेजर जातो. अंधार)

मॅनेजरः रसिकहो, दीनानाथ थेटरात तुमचं हार्दिक स्वागत. तुम्हाला माहीत आहेच की आजच्या दुसऱ्या रात्रीचा खेळ असेल नाटक 'कौमुदी'. खेदाची गोष्ट ही आहे की...म्हणजे तुम्हाला माहीत असेलच की सत्यशीलजींची दृष्टी अधू होत चालली आहे. त्यामुळे ते आज रंगमंचावर येऊ शकणार नाही. तर आजच्या सादरीकरणात एकलव्याची भूमिका साकार करतील सुप्रसिद्ध युवा अभिनेता परितोष कुमार...

(टाळ्या वाजत नाही. स्तब्धता)

आपण स्थानापन्न व्हावं. आमचे सगळे कलाकार तितक्याच ताकदीचे आहेत आणि आजचं सादरीकरण तेवढंच रंगेल ह्यात मला काहीच शंका नाही.

(नदीकाठावर सत्यशील आपल्या कुत्र्यासोबत. हसतो आहे.)

सत्यशीलः मॅनेजर वेडा झालाय. (कुत्र्याला) माझ्याशिवाय हे दीनानाथ काहीच नाही. मी नाही गेलो तर पाच दिवसात बंद होईल. (अभिमन्यूचं भूत तिथे येतं. कुत्रा भुंकायला लागतो. अभिमन्यू कुत्र्यापाशी येताच कुत्रा घाबरून भुंकायचं थांबवतो. सत्यशील त्याला बघतो.) तर तूही आज दीनानाथ सोडून इथे आलास. मी समजू शकतो. सत्यशील शिवाय दीनानाथ आहे तरी काय?

अभिमन्यूः आज नाटक दीनानाथात नाही इथे घडतंय सत्यशील. मनात म्हटलं तुझ्या ढोंगाच्या नाटकापेक्षा तुझं खरं नाटक बघावं. एकटाच बसलायस?

सत्यशीलः एकटा कुठे? हा कुत्रा आहे की बरोबर. त्याच्यासोबत दीनानाथच्या सुरू झालेल्या बर्बादीची मजा ऐकतोय. मॅनेजरला काही कळत नाही. एकलव्याचं पात्र साकार करायला कोणी शिकवलेला कलाकार नाही तर असा कलाकार पाहिजे जो आपल्या अनुभवाशी प्रामाणिक आहे. शिक्षण माणसाला केवळ तंत्र शिकवू शकतं, कला नाही.

अभिमन्यूः तू काहीही केलंस तरी ह्या कुत्र्याला नदी पार करवू शकणार नाही.

सत्यशीलः मी काहीही करू शकतो. मी कलाकार आहे. सत्याचं पात्र आहे. तू केवळ माझी कल्पना.

अभिमन्यूः (हसतो) मी एक योद्धा, तू एक कलाकार. तुझं खोटारडं जीवनही सत्य आणि माझा मृत्यू केवळ कल्पना? तू खेळशील हा कौमुदीचा खेळ, पण तुझा मोक्ष कौमुदीत नाही अंधारात आहे. तीन निरनिराळी सत्य आहेत, सत्यशील - तुझं सत्य, माझं सत्य, आणि हे सत्य की मनुष्य मिथ्यातच सत्याला शोधतो. सत्य केवळ सत्याची अशक्यता आहे. सत्य जाणायचंच असेल तर आपल्या घाबरून गेलेल्या कुत्र्याला विचार जो न महानतेमुळे ना प्रतिशोधाच्या प्रतीक्षेत तुझ्यासोबत उभा आहे. ज्याने इतकी वर्षं आपल्या दोन वेळच्या खाण्यासाठी तुला पाळलंय. ज्याला आजही तू पाण्याशी घेऊन जाऊ शकत नाही. सत्य तुझ्या हातात बंदिस्त आहे आणि तू आपल्या महानतेमध्ये मुक्ती शोधतोयस. तू आंधळा आहेस सत्यशील तुमच्या दीनानाथ थेटरात सगळेच आंधळे आहेत.

(मंचाच्या मध्यभागी परितोष एकलव्याच्या वेषात. मॅनेजर अभिमन्यूच्या भूमिकेत)

मॅनेजरः हे दुर्योधना, मनात आलं तर मी तुला आत्ताच मारू शकतो. तू आहेस निरस्त्र, हताश. मनात आणलं तर द्रौपदी मातेच्या अपमानाचा प्रतिशोध मी ह्याक्षणीच घेऊ शकतो पण मी पांडव आहे. आणि पांडवासाठी प्रतिज्ञेहून मोठा कुठलाच धर्म नाही. तू जाऊ शकतोस आपलं असहाय अवैध जीवन घेऊन. एका अधुऱ्या पराभवाचं कर्ज माथ्यावर घेऊन तू परतशील आपल्या शिबिरात. मी दान दिलेलं आयुष्य घेऊन महाबली भीमाच्या हाती येणाऱ्या मरणाची प्रतीक्षा करत. जशी केली आहे द्रौपदीमातेने आपल्या प्रतिशोधाची प्रतीक्षा, आता तू करशील त्या प्रतिशोधाच्या पूर्ततेची. हाच तुला शाप आहे.

एकलव्यः अभिमन्यू...

अभिमन्यूः तुम्ही?

एकलव्यः कुठला प्रतिशोध एवढा महत्त्वपूर्ण आहे पांडवा, ज्यासाठी इतक्या साऱ्या लोकांचे प्राण वाचवण्याचा अवसर तू घालवतो आहेस?

अभिमन्यूः मी समजलो नाही महाराज..

एकलव्यः दुर्योधनाचा वध होताच हे युद्ध समाप्त होईल. हे अगणित सैनिक जे ना पांडव ना कौरव, जे केवळ तुमच्या व्यक्तिगत युद्धापोटी आपल्या निष्पाप प्राणांची आहुती देत

आहेत, त्यांना तू थांबवू शकतोस. त्यांच्या प्राणापेक्षा पांडवांच्या प्रतिज्ञेचं मूल्य अधिक आहे का?

अभिमन्यूः हा नीतीचा नियम आहे महाराज. तुम्ही कृष्णाला...

एकलव्यः नीतीचे नियम कृष्णाने बनवलेत. कृष्णाला मी काय विचारू? कृष्ण जे बनवेल तेच नीतीचे नियम. कृष्णाचे कृष्णासाठी काय नियम आहेत अभिमन्यू? असं कोणतं षडयंत्र आहे जे कृष्णाने स्वतःविरुद्ध रचलंय? धर्म आणि जातीभेद मानणारा कृष्ण, हिंसेला धर्मसूत्रांत बांधणारा कृष्ण, तो कृष्ण जो द्रौपदीची लाज राखायला तिच्या विनवणीवरच जाणं उचित समजतो, जो भावाभावामधलं युद्ध थांबवत नाही, जो कौमुदीत अर्जुनाला गीतेचं सार सांगतो. कृष्णाला कौमुदीचा उपदेश कोण देईल? अशी कुठली कौमुदी आहे जिने कृष्णातल्या अंधाराला प्रकाशाचा स्पर्श मिळेल? कृष्ण देऊ शकतो का ह्या अगणित निष्पाप प्राणांचा हिशेब? कृष्ण म्हणतो सगळा संसार त्याच्यात विलीन होणार आहे. खरंच का सगळ्या संसाराला कृष्णात विलीन व्हायचंय? हे वीर अभिमन्यू, तू स्वतःलाच विचार, कृष्ण खरंच कोणी व्यक्ती आहे का केवळ मनुष्याच्या क्रूरता आणि दुर्बलतेचं नाव आहे कृष्ण?

अभिमन्यूः तुम्ही अधर्माच्या गोष्टी करीत आहात महाराज. तुम्ही आदिवासी, तुमच्यात सभ्यतेचा लवलेश नसावाच.

एकलव्यः जर सभ्यतेची व्याख्या पाच पांडव आणि शंभर कौरवांसाठी ब्रह्मांडाचा विनाश घडवून आणणे असेल तर माझ्या असभ्यतेवर मला गर्व आहे. आदिवासी जीवनक्रमात आजही नीतीचे नियम शाश्वत आहेत आणि ते हेच सांगतात की प्रतिशोध आणि प्रतिज्ञेपेक्षा प्राण कैक पटीने अधिक मूल्यवान आहे.

(विराम. स्तब्धता. टाळ्या. दुसऱ्या बाजूने सत्यशील आणि अभिमन्यूचं भूत)

अभिमन्यूः हा एकलव्य तुझ्याहून कितीतरी अधिक मूल्यवान आहे सत्यशील. हा तो आहे जो तू एकेकाळी होतास. तो सत्यशील ज्याला एकलव्याची भूमिका साकारण्यासाठी पुरस्कार प्राप्त झाला होता... हा जो ह्याक्षणी माझ्यापुढे आंधळा उभा आहे, तो तर एका कुत्र्याला पाण्यापाशी घेऊन जाण्यासही असमर्थ आहे.

(सत्यशील कुत्र्याला बघतो. त्याच्यावर झडप घालतो. कुत्रा भुंकायला लागतो. सत्यशील त्याला वारंवार पाण्यात बुडवतो. सत्यशील कुत्र्याला बुडवून मारून टाकतो. आता नदीकाठी तो एकटाच आहे. दुरून टाळ्यांचा आवाज.)

(मॅनेजर स्टेजवर काही काम करतोय. मुरारी पण आहे. सत्यशील प्रवेशतो. मुरारी सत्यशीलच्या पायी पडतो.)

मुरारीः चहा पिणार सत्यशील साहेब?

सत्यशीलः हां, चालेल!

मॅनेजरः तुम्ही आलात?

सत्यशीलः आज शेवटची रात्र आहे. आणि नाटकाचा सगळ्यात महत्त्वाचा भाग.

मॅनेजरः तुम्ही नाटकासाठी आलात?

सत्यशीलः	हो! तुम्हाला काही शंका?

मॅनेजरः	नाही. शंका नाही. पण न जाणो का मला असं वाटतंय की आजही तुम्ही स्वतःसाठीच आला आहात.

सत्यशीलः	ह्या थेटरात माझंही महत्त्वाचं योगदान आहे मॅनेजर साहेब. तुमच्या बेजबाबदारपणामुळे मी दीनानाथाच्या प्रतिष्ठेला तडा जाऊ देणार नाही.

(परितोष प्रवेशतो)

परितोषः	(ओशाळून) अं, माफ करा मी नंतर येतो!

मॅनेजरः	नाही नाही परितोषजी, या बसा. (परितोष सत्यशीलला बघतो. सत्यशीलची दृष्टी पूर्णपणे गेलेली आहे. मुरारी खुर्ची घेऊन येतो आणि परितोषच्या मागे ठेवतो.

विराम.

(परितोष खुर्ची सत्यशीलपाशी ठेवतो.)

सत्यशीलः	धन्यवाद मुरारी! (बसतो)

परितोषः	तुम्ही..तुमचे डोळे..

सत्यशीलः	खराब दिसतायत? काळा चष्मा घालू?

परितोषः	तुम्ही.. तुम्ही बघू शकता मला? मी तुमच्या एकदम समोर बसलोय.

सत्यशीलः	मला तुला जवळून बघायची हौस नाहीये.

मॅनेजरः	सत्यशीलजी आज रात्री एकलव्य करणार आहेत असं म्हणतायत. आम्ही त्याचबद्दल बोलत होतो. तुमचं काय मत आहे? (स्तब्धता)

सत्यशीलः	आता हा सांगणार का की मी दीनानाथाच्या स्टेजवर पाऊल ठेवायचं का नाही ते?

परितोषः	मला नाही वाटत ह्यांनी ह्या अवस्थेत स्टेजवर जाणं संयुक्तिक आहे.
(सत्यशील परितोषला एक थप्पड लगावतो. परितोष पडतो. मॅनेजर पुढे सरसावतो पण परितोष त्याला खुणेने थांबवतो.)

सत्यशीलः	तू उपकार करणारेस माझ्यावर? काय आहे माझी अवस्था? तुझ्यासारखा टुकार अभिनेता दोन काय दहा डोळे घेऊन देखील आंधळाच आहे. आणि तू मला..तुला बनायचंय ना एकलव्य? ठीक आहे. तू पडद्याआडून मला बघत अभिनय शिकलायस ना? मला गुरुदक्षिणा दे...देशील?

परितोषः	तुम्हीच एकलव्य करावा असं माझं मत आहे. कारण माझी पूर्ण तयारी अभिमन्यूची आहे. मला जे करायचं होतं ते मी काल केलंय बाबा आणि ते करताना मला माझा प्रतिशोधही मिळालाय. प्रेक्षकांना भले माझं काम आवडलं असेल पण बाबा एकलव्य तुम्हीच आहात. तुम्ही तुमचं पूर्ण आयुष्य त्या भूमिकेसाठी दिलंय. मी केवळ एकलव्याला एक शरीर म्हणून साकार करू शकतो, एक विचार म्हणून नाही. आज

मी करेन अभिमन्यू. हे मी तुम्हाला गुरुदक्षिणा म्हणून देत नाहीये. खूप छोटा शब्द आहे. द्रोणाचार्यांनी त्या शब्दाला कायमचं दूषित करून ठेवलंय.. आणि तुम्ही माझे गुरू नाही आहात. जसे द्रोण एकलव्याचे गुरू नव्हते. तुमच्यात द्रोणासारखी क्रूरता नेहमीच होती पण माझ्यात एकलव्यासारखं शौर्य नव्हतं. मी तुम्हाला निराशच केलं असतं.



सत्यशीलः मॅनेजर साहेब ह्याला इथून चालतं व्हायला सांगा. मला ह्याच्याकडून एक शब्दही ऐकायचा नाहीये.

परितोषः मी जातोय बाबा. फक्त एक गोष्ट सांगायची होती. काल रात्री मला ह्या थेटरात तुम्ही काय तुमच्यातला कलाकार पण भेटला नाही. हा पण अभिमन्यूचं भूत दिसलं. ते सांगत होतं की तुम्ही मांडवीकिनारी झोपला होता. मी रात्री तिथं आलो. तुम्ही तुमच्या कुत्र्याला मारून टाकलं होतं. तुमचा कलाकार मला तिथे भेटला. त्याला पाण्यात बुडायची भीती वाटत होती. आणि ह्यावेळी कोणीही त्याचे पाय धरले नव्हते. आता सगळं तुमच्या हातात आहे बाबा...

(मॅनेजर स्टेजच्या मध्यभागी उभा. प्रकाश.)

मॅनेजरः रसिक प्रेक्षकहो, आपणा सर्वांचं दीनानाथ थिएटरात स्वागत आहे. आज ह्या प्रयोगाची शेवटची रात्र. आणि मला हे सांगताना अतीव आनंद होत आहे की आज तुमच्यासमोर अजून एकदा येतील असे एक महान कलाकार ज्यांनी आपलं संपूर्ण जीवन रंगभूमीच्या सेवेसाठी बहाल केलं...एक असे अभिनेते ज्यांची साधना आणि तपस्या रंगभूमीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल...ह्या थेटराचं वैभव.. मास्टर सत्यशील...आणि त्यांच्या जोडीला आजच्या पिढीतले प्रसिद्ध अभिनेते परितोष कुमार...सादर करत आहोत नाटक 'कौमुदी' अंतिम खंड.

(टाळ्या)

सत्यशीलः जिथे पाहावं तिथे महारथी
कित्येक घोडेस्वार कित्येक सारथी
मध्यभागी वीरोत्तम वीर
पाहून स्तब्ध झालंय रण
देवादिक करती नमन
गोठल्या नद्या, स्थिर वन

ना वायू, मेघ, सूर्य, चंद्र
थोपवू शकतील हे पतन
सगळं होऊन जाईल राख
जो वीर कोसळेल अवनीवर
अवनीवरच होईल निधन
आज होईल सर्व राख
धारातीर्थी पडेल जेव्हा अभिमन्यू
घेरला गेलाय वीर आज
चारी दिशांना चक्रव्यूह
घेरला गेलाय वीर आज
चारी दिशांना चक्रव्यूह

अभिमन्यूः कुठे आहेत सगळे? एवढे कौरव जर इथे लावून दिलेत तर तेवढे पांडवसुद्धा मोकळेच असतील ना...की नाही? कुठे गेले सगळे?

(संगीत. एकलव्य प्रकट होतो)

सत्यशीलः प्रणाम वीर युवक.

अभिमन्यूः हे काय..सूर्य का ढळतोय...आताच दोन चार जणांना मारलं असतं. पुन्हा तीच कौमुदी. आता काय ज्ञान देणार आहात तुम्ही हे बिनअंगठ्याचे शूद्र राजा?

सत्यशीलः एकदोघांना मारशील. त्याच्या नंतर काय करशील? मरावं तर तुला लागेलंच.

अभिमन्यूः प्रोत्साहन दिल्याबद्दल धन्यवाद, पण मी माझ्यापरीने पूर्ण प्रयत्न करून ह्या चक्रव्यूहाचं तंत्र समजण्याचं धाडस तरी करतो.

सत्यशीलः हे तंत्र मंत्रांनी काहीएक होणार नाहीये. एवढं सोपं नाहीये. इथे तुझ्या प्राणावर बेतलंय आणि तू तंत्र समजण्यात गुंग आहेस? गुरू द्रोणाच्या गुरुकुलाचा शिष्य आहेस का?

अभिमन्यूः हो!

सत्यशीलः तरीच. तर मग तुझा मृत्यू अटळ आहे. गुरू द्रोणासारखा लबाड कपटी शिक्षक मी अजून तरी पाहिला नाही. एवढ्या त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांनी अर्धंकच्चं शिकवलंय की मला कधी कधी शंका येते की त्यांनी स्वतःविरुद्धच षडयंत्र रचून स्वतःलाच दोन तीन गोष्टी कमीच शिकवल्या असतील. माझ्याकडून तर त्यांनी माझा अंगठाच मागितला.

अभिमन्यूः अस्सं? तर तू तो आहेस. तरीच मी विचार करत होतो की तुझ्या अंगठ्याचं रहस्य ते नेमकं काय.

सत्यशीलः पण तू हा विचार कर की ह्या सर्वांनी षडयंत्र कोणाविरुद्ध केलं?

अभिमन्यूः कोणाविरुद्ध?

सत्यशीलः अर्जुन. तुझ्या पित्याविरुद्ध.

अर्जुनः काय? (सत्यशील त्याला अंगठा दाखवतो. अर्जुन परत पळतो)

सत्यशीलः आयुष्यभर आपला प्रिय शिष्य म्हणून गोंजारत आलेत आणि आता त्याच्याच पुत्राला मारायला रणात सज्ज आहेत. आणि कर्णाला आदेश देत आहेत की तू मागून वार कर. म्हणत आहेत युद्धाचे नियम अभिमन्यू सारख्या योध्याला मारण्यासाठी तोडले जाऊ शकतात.

अभिमन्यूः हो महाराज, पण हा सर्व नीतीचा खेळ आहे.

एकलव्यः पुन्हा त्याच मूर्खपणाच्या गोष्टी. ह्या मोठ्या मोठ्या शब्दात स्वतःला अडकवू नकोस. एक गोष्ट सरळ आहे. हे गुरू द्रोण कोणाचेच नाही.

अभिमन्यूः एकलव्य..

सत्यशीलः बोल.

अभिमन्यूः मला माहीत आहे की तुम्हाला चक्रव्यूह भेदायचे तंत्र ज्ञात आहे.

सत्यशीलः मग?

अभिमन्यूः सांगा.

सत्यशीलः मी तुला शिकवीन, अभिमन्यू...(टाळ्या)

जीवन आणि मृत्यू दोन्ही अंधकाराचीच प्रतीकं आहेत.

(भूमिकेच्या बाहेर येऊन.) काय जीवन काय मृत्यू..

(इतर कलाकार चिंतीत.)

अभिमन्यूः एकलव्य मला माहीत आहे की तुम्हाला ज्ञात आहे चक्रव्यूह भेदायचे तंत्र. सांगा.

सत्यशीलः नाही.

अभिमन्यूः हे बघा एकलव्य, असं करणं बरं नाही.

सत्यशीलः ए, जवळ येऊ नकोस. दूर हो.

अभिमन्यूः सांगा ना एकलव्य. सांगून तुमचं काय जाणार आहे?

कृष्णः ही कौमुदी मी फार वेळ ठेवू शकणार नाही. काय बोलायचं ते लवकर बोला. मुद्द्यावर या.

अभिमन्यूः मामा कुठे आहात तुम्ही?

कृष्णः तुझ्या पित्याचा रथ चालवतोय बाळा.

अभिमन्यूः रथ चालवताय. कुठे चालवताय? रथ चालवताय तर इथे का नाही येत?

कृष्णः	हे काय अर्जुना, तू इथे का उभा आहेस? जा, आपल्या पुत्राला वाचव.

अर्जुनः	कृष्णा, मला उशीर होईल. मी त्याच्यापासून खूप दूर आहे आणि माझ्या रथाचं चाक निखळतंय की काय अशी शंका मला येतेय.

कृष्णः	उशीर कसला होईल मूर्खा, उद्या जर का हा मेला तर जयद्रथाला मारण्यासाठी संपूर्ण कुरुक्षेत्र पालथं घालशील. आज आपल्याच पुत्राला वाचवायचा प्रसंग आल्यावर तू मला तांत्रिक अडचणीचं निमित्त देतोयस?

अर्जुनः	कृष्णा, तू काय विचार करतोयस हे मला माहीत नाही काय? आतापर्यंत मी तुला चांगलाच ओळखायला लागलो आहे.

कृष्णः	काय विचार करतोय मी?

अर्जुनः	तुला हेच हवंय की मी तुला म्हणेन चल अभिमन्यूला वाचवू आणि तू सगळा कामधंदा सोडून सगळं थांबवून मला पुत्राच्या जीवनावर चौदा दिवस उपदेश देशील. ही विश्रांती घ्यायची संधी मी तुला नाही देणार कृष्णा.

कृष्णः	आता काय सांगू तुला बाळा तुझा पिता म्हणतोय रथाचं चाक निखळतंय.

अभिमन्यूः	काय?

सत्यशीलः	बघितलं? आणि कृष्णा तुझं नाटक बंद कर. आपला ह्यात काहीच हात नाही असा आव आणू नकोस. तुझ्या योगदानाशिवाय कुठलाही मनुष्य इतका धूर्त आणि लबाड असू शकत नाही.

कृष्णः हे बघ शूद्रा, व्यर्थ बडबड नको.

अभिमन्यूः आता तुम्हीच मला वाचवू शकता एकलव्य. का नाही वाचवत तुम्ही मला? का नाही सांगत मला चक्रव्यूह भेदण्याचं तंत्र.

सत्यशीलः मी तुला शिकवीन अभिमन्यू.

(टाळ्या. सत्यशील परत ब्रेकडाउन होतो. आधी अर्जुन, मग कृष्ण एकेक करून पुढे येऊन त्याचे संवाद बोलण्याचा प्रयत्न करतात. सत्यशील 'विसरलो नाहीये मी' असं म्हणून ढकलून देतो. सत्यशील मटकन खाली बसतो. अभिमन्यू त्याच्या दिशेने जाऊ लागतो पण तो खुणेनेच त्याला थांबवतो. )

करू नकोस उपकार माझ्यावर. मी अजून आहे शौर्यवान. तू जेव्हा नव्हतास कुठेच मीच होतो इथे वर्तमान.

अभिमन्यूः तुम्ही तेव्हाही होतात शूर आणि आजही शूरच आहात. परंतु अभिमन्यूही आहे वीर हेही तुम्ही जाणता.

सत्यशीलः तुझा नाही परिचय मला
का मी तुला ज्ञान देऊ?
मृत्यू, जीवन, दंड, दोष
हे सगळंच माझ्या विपरीत आहे
मी संपूर्ण आहे
मी अर्जुन आहे मी कर्णही
मी भीष्म अन द्रोणही

प्रत्येक महान योध्याचा अंश आहे
प्रत्येक शूरवीराचा मी वंश आहे
जेव्हा नव्हतं काहीच इथे
एकलव्य इथे वर्तमान होता.

अभिमन्यूः एकलव्य,
तू बनलास इतिहास
आपल्या विद्येमुळे
तू स्वतःलाच विचार
का नाहीस तू आजही मुक्त
का नाही तुला मोक्ष प्राप्त
ना हे युध्द तुझं
ना मी पुत्र तुझा
ना कौरव तू
ना पांडव तू
का आहेस तू इतिहासात
स्वतःच्या नाही पण परक्यांच्या
तुझी कौमुदी आहे तुझ्यापेक्षा महान
तुझी मुक्ती करते याचना
अजून एक एकलव्य दे
तू आहेस मुक्त
सत्य हीच विद्या तुझी
हे एकलव्य तू सत्य दे
ही कौमुदी आहे तुझी

तू कौमुदीचं सत्य दे
ही कौमुदी आहे तुझी
तू कौमुदीचं सत्य दे

(स्तब्धता. परितोष सत्यशीलच्या दिशेने सरसावतो. तो सत्यशीलला आलिंगन देणार इतक्यात सत्यशील त्याला दूर लोटून देतो.)

परितोषः तुम्ही का नाही शिकवत मला बाबा?

सत्यशीलः ज्ञान सत्यात नाही
कर्मात आहे, अभिमन्यू!
कृष्णाचं स्वतःचं काही सत्य नाही
तू नाहीस निरस्त्र
तीर, तलवार, बलाने नाही
जे हाती लागेल त्याने युद्ध कर
तू ह्याक्षणीही नाहीस निरस्त्र
ह्या निखळलेल्या चक्राने युद्ध कर
अंती विजय कौरवांवर नाही
तर आपल्या शोक, भय,
आपल्या अहंकारावर प्राप्त कर..

एकलव्य सत्याचं नाही
कर्माचं पात्र आहे
माझं कर्म आता समाप्त झालं

तूच आहेस कृष्ण, तूच अर्जुन,
एकलव्यही आता तूच कर.

सत्यशील: आता मला काहीच दिसत नाहीये अभिमन्यू. फक्त धूसर धुकं तेवढंच दिसतंय. आता फक्त तेच बाकी राहिलंय. केवळ तो निळाशार हिरवा प्रकाश माझ्याच दिशेने येतोय. तू कुठे आहेस अभिमन्यू?

(परितोष त्याच्यापाशी जाऊन बसतो. सत्यशील त्याच्या डोक्यावर हात ठेवतो. चेहऱ्यावरून हात फिरवतो. गळाभेट. टाळ्या. बाकी पात्रं येऊन कर्टन कॉल घेतात पण त्यात सत्यशील नाही. तो मागे उभा आहे. परितोष त्याला मागे वळून बघत असताना पडदा.)

**समाप्त**